www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

देशाची शान, सर्वांचा अभिमान चला जपूया तिरंग्याची प्रतिष्ठा आणि करुया सन्मान



दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

देशाची शान, सर्वांचा अभिमान चला जपूया तिरंग्याची प्रतिष्ठा आणि करुया सन्मान



सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ९१ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरूवार,१५ ऑगस्ट २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## घरोघरी तिरंगा फडकवा, प्रत्येकाच्या हृदयी तिरंग्याप्रती सन्मान असावा

## ७८व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व भारतीयांना मन:पूर्वक शुभेच्छा

स्वातंत्र्यदिनानिमित्त दैनिक लोकरक्षणाय कार्यालयास सुट्टी असल्यामुळे दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची नोंद सर्व वाचक, हितचिंतक व जाहिरातदारांनी घ्यावी.

- व्यवस्थापक

# अटल सेतूतील जोडरस्त्यावरील तडे प्रकरण : अखेर कंत्राटदाराला एक कोटी रुपये दंड

● मुंबई, विशाल कारंडे :

**अटलबिहारी वाजपेयी शिवडी – न्हावाशेवा सागरी सेतूच्या (अटल सेतू) जोडरस्त्यावर तडे पडल्याचे जूनमध्ये निदर्शनास आले होते. ही बाब निदर्शनास येताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) तात्काळ जोडरस्त्याची दुरुस्ती केली. मात्र या प्रकरणी संबंधित कंत्राटदाराविरोधात कोणतीही कारवाई झाली नव्हती. आता कंत्राटदारावर कारवाई करून एक कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.**



नवी मुंबई आणि मुंबईतील अंतर १५ मिनिटांत पार करता यावे यासाठी एमएमआरडीएने १८ हजार कोटी रुपये खर्च करून २२ किमी लांबीचा अटल सेतू बांधला. या अटल सेतूचे लोकार्पण जानेवारीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. मात्र अटल सेतूवरून उलवे येथून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जोडरस्त्यावर तडे पडल्याची बाब निदर्शनास आली होती. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी जूनमध्ये ही बाब प्रसारमाध्यमांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर यावरून एमएमआरडीए आणि एकूणच कामाच्या दर्जावर टीका झाली होती. दरम्यान, तडे पडल्याचे वृत्त पसरताच एमएमआरडीएने तात्काळ जोरस्त्याच्या दुरूस्तीचे काम हाती घेतले आणि काही तासातच ते पूर्ण केले. अटल सेतूला कुठेही धोका नाही, २२ किमी लांबीच्या सेतूवर तडे पडलेले नाहीत, सेतूला जोडलेल्या जोडरस्त्यावर तडे पडल्याचे स्पष्टीकरण यावेळी एमएमआरडीएकडून देण्यात आले होते.

एमएमआरडीएने रस्त्याची दुरूस्ती करून घेतली. मात्र कंत्राटदाराविरोधात केलेल्या कारवाईची माहिती उपलब्ध झाली नव्हती. आता मात्र संबंधित कंत्राटदाराविरोधात एमएमआरडीएने दंडात्मक कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना माहिती अधिकाराखाली उपलब्ध झालेल्या माहितीनुसार जोडरस्त्यावरील तडेप्रकरणी कंत्राटदार कंपनी स्ट्रॅबॅगवर त्याचवेळी 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली होती.

पान २ वर

## थोडक्यात



### बडतर्फ आयएएस पूजा खेडकर यांच्या कुटुंबीयांच्या कंपनीचा लिलाव

● पिंपरी, अभिजीत येरल्लू :

भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) बडतर्फ प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर हिच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या तळवडेतील कंपनीचा दोन लाख ८७ हजारांचा थकीत मालमत्ता कर आणि एक लाख ७८ हजार रुपयांच्या पाणीपट्टीचा भरणा केला आहे. त्यामुळे कंपनीचा लिलाव टळला आहे.

पान २ वर

### सिन्नर 'एमआयडीसी'तील समस्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला सविस्तर आढावा



● मुंबई, यश सावंत :

नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील 'इंडिया बुल्स' प्रकल्पाकरिता संपादित जमिनीच्या व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या वैयक्तिक मालकीच्या जमिनीच्या सातबाऱ्यांवरील कर्जाचे बोजे दि. ३१ ऑगस्टपर्यंत हटवून त्याबाबतचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना आज दिले. त्याचबरोबर सिन्नर 'एमआयडीसी'तील उद्योजकांना भेडसावणारे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीच्या विविध समस्या सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत (व्हिसीद्वारे), आमदार ॲड माणिकराव कोकाटे, आमदार राजू कारेमोरे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव सौरभ विजय, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपिन शर्मा, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे डॉ. अविनाश ढाकणे, नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा (व्हिसीद्वारे) उपस्थित होते.

पान २ वर

## महायुतीची लाडकी आमची खुर्ची योजना - नाना पटोले



● अमरावती, सचिन कदम :

महायुतीचे सरकार निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना जाहीर करीत आहे, आता त्यांनी 'लाडकी आमची खुर्ची' ही योजना आणली आहे. महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा दावेदार कोण, हे आता त्यांनाच विचारले पाहिजे, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी येथे पत्रकारांशी बोलताना लगावला.

नाना पटोले म्हणाले, भाजपप्रणित महायुती सरकारने हा समृद्ध महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण, गरीब व सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देणे ही काँग्रेसची भूमिका आहे. महाविकास आघाडी म्हणून विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. निवडणुकीनंतर सर्वसहमतीने मुख्यमंत्री ठरवू. महाराष्ट्राचा स्वाभिमान व महाराष्ट्र वाचविणे ही काँग्रेसची प्राथमिकता आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी येथे बुधवारी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

पान २ वर

## नक्षल्यांशी दोन हात करणाऱ्या १७ पोलीस जवानांना शौर्य पदक

● गडचिरोली, दिगंबर जाधव:



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवाची बाजी लावून नक्षल्यांशी दोन हात करणाऱ्या गडचिरोली पोलीस दलातील १७ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक जाहीर झाले आहे, तर एका पोलीस अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक घोषित झाले. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला ही घोषणा करण्यात आली. त्यामुळे जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.देशभरातील पोलीस दलात तसेच सशस्त्र दलात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना स्वातंत्र्य दिनानिमित्त सन्मानित केले जाते. यावर्षी सुद्धा राष्ट्रपतींनी देशभरात एकूण २०८ पोलीस शौर्य पदक व ६२४ गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर केले असून, त्यापैकी गडचिरोली पलीस दलास १७ शौर्य पदक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी एक पदक जाहीर झाले आहे. यामध्ये गडचिरोलीत अपर पोलीस अधीक्षक म्हणून सेवा बजावलेले व सध्या वाशिमचे पोलीस अधीक्षक असलेले अनुज तारे, उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, सहायक निरीक्षक राहुल देव्हडे, उपनिरीक्षक दीपक औटे, विजय सपकाळ, हवालदार महेश मिच्चा, कोतला कोरामी,नागेशकुमार मादरबोईना, समय्या आसम,महादेव वानखेडे,विवेक नरोटे, मोरेश्वर पोटावी, अंमलदार कोरके वेलादी, कैलास कुळमेथे, शकील शेख, विश्वनाथ पेंदाम यांना राष्ट्रपतींचे पोलीस शौर्य पदक मिळाले असून, उपनिरीक्षक मधुकर नैताम यांना राष्ट्रपती यांचे गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक मिळाले आहे.

पान २ वर

## जलवाहिन्यांवर बूस्टरपंप बसविल्यास गृहनिर्माण संस्थेवर सिडको कारवाई करणार



● पनवेल, भावना जैन :

अपु-या पाणी पुरवठ्यामुळे गृहनिर्माण संस्थांनी जलवाहिनीवर पाणी खेचण्यासाठी बूस्टरपंप बसवले. त्यामुळे ज्या गृहनिर्माण संस्थांनी बूस्टरपंप बसवले नाही त्यांना थेंबभर सुद्धा पाणी पुरवठा होत नसल्याने लाखो रुपये खर्च करुन या गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरने पाणी खरेदी करावे लागते. बेकायदा बूस्टरपंपवर नियंत्रणासाठी सिडको मंडळाने मंगळवारपासून खास मोहीम हाती घेऊन खारघर वसाहतीमधील सेक्टर ३४, ३५ येथील गृहनिर्माण सोसायट्यांनी लावलेली बूस्टरपंप हटवले.खारघरप्रमाणे कळंबोली, कामोठे, पनवेल, करंजाडे, द्रोणागिरी या नोडमध्ये ही कारवाई केली जाईल अशी माहिती सिडको मंडळाच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली आहे. सिडकोने गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिका-यांना स्वताहून बूस्टरपंप हटविण्याचे आवाहन केले आहे. सिडकोच्या शोध मोहीमेमध्ये बूस्टरपंप गृहनिर्माण सोसायटीने लावल्याचे आढळल्यास संबंधित गृहनिर्माण सोसायटीवर कायदेशीर कारवाई करु असा इशारा सिडकोच्या जनसंपर्क विभागाने दिला आहे.

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर शिक्षकांनी भर द्यावा

### शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे शिक्षकांना आवाहन



● मुंबई, विशाल पाटील :

शासनाने राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३ - ०४ ते २०१८-१९ या कालावधीत वाढीव पदावर कार्यरत पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबतचा निर्णय घेतला होता. त्यानुसार वाढीव पदावरील १८ पात्र शिक्षकांच्या समायोजन आदेशाचे वाटप शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर भर द्यावा, असे सांगून श्री.केसरकर यांनी समायोजित शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यावेळी उपस्थित होते.

पान २ वर

## पर्ससीन मच्छिमारांचे आजपासून आंदोलन

### इतर राज्यांप्रमाणे पर्ससीन मासेमारीला परवानगी देण्याची मागणी



● उरण, धनश्री सट्टा :

शासनाने इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील पर्ससीन मासेमारीला परवानगी द्यावी या मागणीसाठी स्वातंत्र्यदिनापासून मासेमारी बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सरकारविरोधात मच्छिमारांचा संघर्ष तीव्र होण्याची शक्यता वाढली आहे. या आंदोलनात १ हजार २०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी सहभागी होणार असल्याची माहिती पर्ससीन मच्छिमार संघटनेने दिली आहे. यामुळे पारंपरिक व आधुनिक मासेमारी असा वाद राज्यात निर्माण झाला आहे.

पान २ वर

## "विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी वळवले"

### सुषमा अंधारेंचा शिंदे सरकारवर आरोप



● पुणे, अभिजीत येरल्लू :

शिंदे सरकारने यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पात राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. तेव्हापासून या योजनेवरून राजकारण तापलं आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीका-टीप्पणी आणि आरोप प्रत्यारोप करत आहेत. दरम्यान, आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी यावरून शिंदे सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.

सुषमा अंधारे या पुणे दौऱ्यावर असून त्यांनी आज माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी शिंदे सरकारवर जोरदार टीका केली. तसेच त्यांनी लाडकी बहीण योजनेवरून सरकारवर गंभीर आरोपही केले. सरकारने विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा पैसा लाडकी बहीण योजनेसाठी वळवला, असे त्या म्हणाल्या.

### नेमकं काय म्हणाल्या सुषमा अंधारे?

"राज्यातल्या २७ लाख महिलांचे आधार कार्ड बॅंक खात्याला जोडले गेलेले नाहीत. त्यामुळे त्यांना लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळतील की नाही, हा मुद्दा आहेच, याशिवाय दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने का स्पष्ट केलं, की अंगणवाडी सेविका असतील, किंवा आशा वर्कर असतील किंवा भूसंपादनाचे पैसे असतील, यांचे सर्व पैसे सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी वळते केले आहेत. त्यामुळे गरजू लोकांना त्यांच्या हक्काचा पैसा मिळत नाही. या सगळ्यावर शासनाकडे काय उत्तर आहे?" असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला आहे. तसेच "शासनाच्या तिजारीत पैसा नसताना, त्यांनी इतरांचे पैसे लाडकी बहीण योजनेसाठी का वळते केले? याचं उत्तर सरकारने दिलं पाहिजे",असेही त्या म्हणाल्या.

"शिष्यवृत्तीचा पैसा लाडकी बहीण योजनेसाठी वळवला"

"गेल्या पाच दिवसांपासून पुण्यात बार्टी, सारथी आणि आर्टीची जे विद्यार्थी आंदोलन करत आहेत. हे सगळे विद्यार्थी उपोषणाला बसले आहेत. कारण त्यांना त्यांच्या संशोधनासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती अद्याप देण्यात आलेली नाही. दोन वर्ष झाले, त्यांना या शिष्यवृत्तीचे पैसे मिळालेले नाहीत. विद्यार्थ्यांना शिष्यवृतीचे पैसे न देता, त्याचे पैसे लाडकी बहीण योजनेकडे वळवले आहेत.

पान २ वर

## संपादकीय

# संशयकल्लोळात 'सेबी'!

'हिंडेनबर्ग' या अमेरिकी गुंतवणूकदार कंपनीने आपल्या नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी-बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक. भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज अॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' म्हणजे 'सेबी' आणि तिच्या प्रमुखांविषयीचे 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप संबंधित यंत्रणांस परेशान तर करतीलच; पण गुंतवणूकदारांच्या मनांत गोंधळ वाढवतील. ते ज्या कंपनीशी संबंधित आहेत त्या कंपनीच्या समभागांचे सोमवारी जे काही झाले त्यावरून हा गोंधळ किती गंभीर असू शकतो हे कळेल. याआधी साधारण दीड वर्षापूर्वी या हिंडेनबर्गने सध्या पंचमहाभूतांस कवेत घेणाऱ्या अदानी समूहावर आरोप केले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन चौकशी समित्याही नेमाव्या लागल्या. चौकशी करणाऱ्या 'सेबी'ने हिंडेनबर्गास नोटीस पाठवली आणि तीस उत्तर देताना या गुंतवणूक-गृहाने 'सेबी'च्या चौकशीलाच वाकुल्या दाखवल्या. येथपर्यंत ठीक. पण या वेळी हिंडेनबर्ग आणखी एक पाऊल पुढे गेले असून अदानी-संबंधित परदेशी वित्तसंस्थांत 'सेबी'प्रमुख आणि त्यांच्या पतीचे गुंतवणूक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यापर्यंत या कंपनीची मजल गेली. तसेच या हितसंबंधांमुळे अदानीसंदर्भातील चौकशी प्रामाणिकपणे होत नसल्याचे हा नवा आरोप सूचित करतो. हे आणखी धोकादायक. त्यामुळे बुच दम्पतीने तातडीने या संदर्भात खुलासा केला आणि आरोप बिनबुडाचे असल्याचा दावा केला. या इतक्या गंभीर आरोपांमुळे राजकीय राळ उडली नसती तरच नवल. विरोधकांनी यावर संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली. यावर नागरिकही आपापले राजकीय राग-लोभ सांभाळत जमेल तशा भूमिका घेताना दिसतात. तथापि त्या सगळ्याच्या पलीकडे जात त्यावर भाष्य व्हायला हवे.

ते करताना आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे माधबी बुच यांची पार्श्वभूमी. खासगी क्षेत्रातून 'सेबी' या भांडवली बाजाराच्या सरकारी नियंत्रकपदी नेमणूक झालेली ही पहिली व्यक्ती. 'सेबी'चे आतापर्यंतचे सर्व प्रमुख हे सरकारी सेवेतून निवडले गेलेले होते. माधबीबाईंचा मात्र अपवाद. त्या जवळपास दोन दशके 'आयसीआयसीआय' या खासगी बँकेत होत्या आणि नंतर मध्येच नोकरी सोडून पतीसमवेत त्यांनी सिंगापूर येथे एक गुंतवणूक कंपनी (फंड) स्थापन केली. या काळात त्या सिंगापूरवासी होत्या. 'सेबी'च्या प्रमुखपदी निवड झाल्यानंतर जवळपास दोन आठवड्यांनी या गुंतवणूक कंपनीतील आपला सर्व वाटा त्यांनी पतीस विकला आणि त्याची सर्व माहिती सिंगापूर सरकारसह भारतीय यंत्रणांनाही त्यांच्याकडून दिली गेली. 'हिंडेनबर्ग' आरोप करतो तो नेमक्या याच गुंतवणूक कंपनीवर. या कंपनीने म्हणजे पर्यायाने बुच दाम्पत्याने अदानींशी संबंधित अनेक वा काही परदेशी कंपन्यांत गुंतवणूक केली आणि ती दडवून ठेवली असे हिंडेनबर्गचे म्हणणे. अदानी समूहात या दोघांचे हितसंबंध असल्याने त्या कंपनीच्या व्यवहारांची चौकशी 'सेबी' प्रामाणिकपणे करू शकली नाही, असे हिंडेनबर्गचा नवा अहवाल सुचवतो. गंमत म्हणजे हा आरोप हिंडेनबर्गने कोणा स्वतंत्र संशोधनाच्या आधारे केलेला आहे असे नाही. तर जी माहिती संबंधित यंत्रणांना आधीच दिली गेलेली आहे, ती त्यांच्या वेबसाइट्सवरून वा अन्य मार्गाने गोळा करून हिंडेनबर्ग त्यातील टिंबे जोडतो आणि बुच दाम्पत्यास घायाळ करतो. या दोघांचे हे घायाळ होणे अपरिहार्य आहे. याचे कारण 'काळ्या' आणि 'पांढऱ्या'च्या बेचक्यात अडकलेले काही प्रश्न. उदाहरणार्थ 'सेबी'सारख्या यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्यांना आवश्यक ते 'डिसक्लोजर'- अर्थात प्रकटन- रास्त वेळी द्यावे लागते. म्हणजे आपण, आपल्या कुटुंबीयांनी, मुला-बाळांनी कोठे गुंतवणूक केलेली आहे, कोठे त्यांचे आर्थिक संबंध आहेत इत्यादींची माहिती जाहीर करणे. त्यामुळे संशयास वाव राहात नाही. तशी ती सर्व माहिती माधबीबाईंनी जाहीर केली होती का? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तर रविवारी उशिरा रात्री त्यांना ''पण आमची काहींतील गुंतवणूक मी 'सेबी'प्रमुख होण्याच्या आधीची आहे'', अशा छापाचा खुलासा का करावा लागला? तसेच 'सेबी'च्या प्रमुख या नात्याने अदानी प्रकरणाच्या चौकशीचा निर्णय घेताना ज्या ज्या परदेशस्थ कंपन्यांचा उल्लेख झाला त्या वेळी त्या कंपन्या आणि बुच कुटुंबीय यांतील संबंध त्यांनी उघड केले का? किंवा या कंपन्यांबाबत निर्णय घेताना त्यांनी त्या निर्णयप्रक्रियेपासून स्वत:स दूर (रिक्यूज) ठेवले का? न्यायाधीश स्वत:शी दूरान्वयानेही संबंधित प्रकरण सुनावणीस आल्यास त्या खटल्यापासून स्वत:स दूर करण्याची विनंती वरिष्ठांस करतात.



## आजची चित्रोळी

उदय पापाचा भुकेतूनी होतो
स्वार्थ त्याच्या मुळाशी वसतो !
गरज मनाला कमकुवत करते
वाट पापाची मन सहज चढतें !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### अटल सेतूतील जोडरस्त्यावरील तडे प्रकरण...

सदर रस्त्याचे ५ जानेवारी २०२४ रोजी काम पूर्ण करण्यात आले असून कामाची गुणवत्ता राखली नसल्याचे या नोटीसमध्ये नमुद करण्यात आले होते. त्यानंतर अटल सेतूचे सल्लागार के. आर. शिवानंद यांनी कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई संबंधी नोटीस बजावली. तसेच एक कोटी रुपये दंड ठोठावला. तसेच आवश्यक ती सर्व दुरूस्ती करण्याचेही निर्देश या नोटीसमध्ये कंत्राटदाराला देण्यात आले होते.

दरम्यान, अटल सेतू महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून दर सहा महिन्यांनी अटल सेतूचे आवश्यक ते परीक्षण करण्याची मागणी गलगली यांनी केली आहे. त्याचबरोबर संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

### महायुतीची लाडकी आमची खुर्ची योजना...

काँग्रेस पक्षासाठी मुख्यमंत्री कोण हा प्राथमिकतेचा मुद्दा नाही. ज्या पद्धतीने महायुतीचे सरकार महाराष्ट्राचा एकेक भाग विकण्याचे काम करीत आहे, त्यांच्यापासून महाराष्ट्राला वाचवणे, हे महत्वाचे काम आहे. काँग्रेसमध्ये लोकशाही व्यवस्था आहे. निवडून आलेल्या आमदारांमधून नेत्याची निवड करण्याची काँग्रेसची परंपरा राहिली आहे. महाविकास आघाडीच्या आमदारांच्या सर्वसहमतीने मुख्यमंत्री निवडला जाईल, असे नाना पटोले म्हणाले. काँग्रेसची ताकद लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्राला दिसली आहे. यावेळीही निवडून येण्याची क्षमता असलेल्या लोकांनाच उमेदवारी दिली जाईल, स्थानिक नेतृत्वाचे मत विचारात घेतले जाईल, असे नाना पटोले यांनी सांगितले.

काँग्रेसकडे मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असले तर त्यांनी सांगावे, असे वक्तव्य शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी काल, मंगळवारी केले होते, त्यावर प्रतिक्रिया विचारली असता काँग्रेसला संजय राऊत यांच्या विधानावर कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त करण्याची गरज नाही, असे नाना पटोले म्हणाले.

नाना पटोले म्हणाले, राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व त्यांच्या नंतरच्या मुख्यमंत्र्यांच्या अथक प्रयत्नांनी महाराष्ट्र घडला व समृद्ध झाला. परंतु भाजपप्रणित महायुती सरकारच्या काळात शेतकरी आत्महत्यांचा प्रदेश, बेरोजगारांचा प्रदेश ही महाराष्ट्राची ओळख बनली आहे. सरकारचे धोरण शेतकरी विरोधी आहे. शेतकरी अधिकाधिक संकटात जात आहे. बेरोजगारांची संख्या वाढत आहे. अनेक प्रकल्प गुजरातमध्ये पळवले जात आहेत. महाराष्ट्रात आता पोकलँडचा खेळ सुरू आहे. त्याची तीन तोंडे आहेत. महाराष्ट्राची लूट सुरु आहे, असे नाना पटोले म्हणाले.

### बडतर्फ आयएएस पूजा खेडकर यांच्या...

पूजा खेडकर हिने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातून अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रहिवाशी पुरावा म्हणून तळवडेतील कंपनीचा पत्ता दिला होता. प्रमाणपत्रासाठी रेशन कार्ड ओळखपत्र म्हणून दिले होते. या रेशनकार्डवरही याच कंपनीचा पत्ता होता. तळवडे गावठाण, ज्योतिबानगर येथे असलेली थर्मोव्हेरिटा प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी पूजा हिची आई मनोरमा यांच्या नावावर आहे. कंपनीकडे सन २०२२ पासून दोन लाख ८७ हजारांचा मालमत्ता कर थकित होता.

नोटिशीनंतरही कर न भरल्याने १९ जुलै रोजी मालमत्ता जप्त केली होती. त्यानंतर कराचा भरणा करण्यास २१ दिवसांची मुदत होती. खेडकर कुटुंबीयांनी सहा ऑगस्ट रोजी दोन लाख ८७ हजार ५९१ रुपयांची मालमत्ताकराची थकबाकी भरली. त्याचबरोबर एक लाख ७८ हजार ६८० रुपयांची पाणीपट्टीही भरली आहे. त्यामुळे कंपनीवरील लिलावाची टांगती तलवार टळली आहे. तळवडेतील थर्मोव्हेरिटा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने थकीत कर भरला आहे. त्यामुळे लिलावाची कारवाई केली जाणार नाही, असे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगि

### सिन्नर 'एमआयडीसी'तील समस्यांचा...

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, उद्योगांना चालना देण्यासाठी माळेगाव व मुसळगाव लिंक रोड लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. हा रस्ता सिन्नर शहराच्या पूर्व व पश्चिमेस असलेल्या दोन औद्योगिक वसाहतींसह रतन इंडिया प्रकल्पाला जोडणार आहे. या रस्त्याकरिता नगरपालिकेने जागा संपादित करुन ती 'एमआयडीसी'ला वर्ग करावी. या रस्त्याचे काम 'एमआयडीसी'ने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

सिन्नर तालुक्यातील मुसळगाव औद्योगिक वसाहतीत पाच एकर क्षेत्रात शंभर बेडच्या हॉस्पिटलची उभारणी करण्यासाठी 'ई.एस. आय.सी.'ला तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. तसेच 'महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६' या कायद्यात सुधारणा झाल्याने तसेच रेडी रेकनरच्या दरानुसार त्याची आकारणी करण्यात येत असल्याने फायर चार्जेसच्या दरात मोठी वाढ झाली आहे. हे दर उद्योजकांना परवडत नसल्याने फायर चार्जेस दर कमी करण्याबाबतचा प्रस्ताव 'एमआयडीसी'ने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना त्यांनी केल्या. त्याचप्रमाणे, सिन्नर औद्योगिक क्षेत्रात बहुतांश अभियांत्रिकी व त्यासंलग्न उद्योग कार्यान्वित आहेत. या उद्योगामुळे रसायनयुक्त सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी त्या क्षेत्रातील सर्व उद्योजकांनी एकत्रित येऊन सामाईक ईटीपी प्रकल्पाची उभारणी करावी. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ७५ टक्के सवलत देण्यात येणार आहे.

### नक्षल्यांशी दोन हात करणाऱ्या १७ पोलीस...

शहीद उपनिरीक्षक धनाजी होनमाने यांना मरणोत्तर शौर्य पदक जाहीर झाले आहे.

कापेवंचा, मोरमेट्टा चकमकीची दखल

सन २०१७ मध्ये मौजा कापेवंचा-कवठाराम, सन २०१९ मध्ये मोरमेट्टा व सन २०२२ मध्ये कापेवंचा-नैनेर येथे झालेल्या पोलीस-नक्षलवादी चकमकीमध्ये एकूण चार नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यास गडचिरोली पोलीस जवानांना यश प्राप्त झाले होते. वरील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी सदरच्या चकमकीमध्ये केलेल्या यशस्वी कामगिरीची दखल घेऊन राष्ट्रपती यांचे पोलिस शौर्य पदक जाहीर झाले.

९६ जणांना पदोन्नती

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंधेला ४१ हवालदारांना सहाय्यक फौजदारपदी व ५५ पोलीस नाईक अंमलदार यांना पोलीस हवालदार पदी पदोन्नती मिळाली आहे. राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक प्राप्त व पदोन्नती प्राप्त पोलिस अधिकारी व अंमलदारांचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी कौतुक केले आहे.

चार वर्षांत दोनशेवर अधिकारी- कर्मचाऱ्यांना शौर्य पदक

यावर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंधेला १८ पोलीस अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपती यांचे पोलीस शौर्य पदक व १ पोलीस अधिकारी यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक प्राप्त झाले होते. २०२४ मध्ये एकूण ३५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना राष्ट्रपती यांचे पोलीस शौर्य पदक व २ अधिकारी व अंमलदार यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक प्राप्त झाले आहे. मागील चार वर्षांत जिल्हा पोलीस दलास एकूण ३ शौर्य चक्र, २०३ पोलीस शौर्य पदक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ८ पदक प्राप्त झाले आहे.

### विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर शिक्षकांनी भर द्यावा

वाढीव पदावर कार्यरत पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयानुसार यापूर्वी मुंबई विभागातील २१ शिक्षकांना मंत्री श्री. केसरकर यांच्या हस्ते १० जानेवारी २०२४ रोजी समायोजनाचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर, यापूर्वी समायोजन न झालेल्या पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याचे आदेश ७ मार्च २०२४ रोजी प्राप्त झाल्यानुसार शिक्षण उपसंचालक कार्यालयाने १६ वाढीव पदावरील कार्यरत शिक्षकांचे समायोजन केले. मात्र काही पात्र शिक्षकांना समायोजनासाठी कनिष्ठ महाविद्यालय उपलब्ध नव्हते, अशा शिक्षकांच्या समायोजनासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून रिक्त जागांचा आढावा घेऊन पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत शासनास विनंती केली होती, त्यानुसार दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या चर्नी रोड येथील राज्य प्रकल्प संचालक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री. केसरकर यांच्या हस्ते १८ शिक्षकांना हे वाटप आदेश देण्यात आले. या कार्यक्रमास संबंधित शिक्षकांसह त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षकांनी शालेय शिक्षण मंत्री आणि राज्य शासनाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

### पर्ससीन मच्छिमारांचे उद्यापासून आंदोलन

मात्र शासनाने या दोन्हींची व्याख्या स्पष्ट करण्याचीही मागणी जोर धरू लागली आहे.

सरकारने राज्याच्या सागरी हद्दीबाहेर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर शासनाने अनेक निर्बंध घातले आहेत.यामुळे पर्ससीन मासेमारीवर व्यवसायावर अवलंबून असलेल्या राज्यातील लाखो मच्छीमारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सात सागरी जिल्ह्यातील पर्ससीन नेट फिशिंग मच्छीमारांची रविवारी अलिबाग येथे महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच सरकार आणि पर्ससीन व्यावसायिकांनी मासेमारी बंदीचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सात जिल्ह्यात सुमारे १२०० बोटी पर्ससीन नेट फिशिंगचा व्यवसाय करीत आहेत. यामध्ये दिवसेंदिवस व्यावसायिकांची संख्येत वाढ होत चालली आहे.

समुद्राच्या तळाशी असलेली नव्हे तर समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणारी मासळी या पर्ससीन नेट पध्दतीने मासेमारी करून पकडली जाते. महाराष्ट्र -१२००, गोवा-८००,केरळ-१५००, कर्नाटक -७००, आणि आंध्रप्रदेश अशा विविध राज्यातील सुमारे ३५०० मच्छीमार बोटी राज्याच्या सागरी हद्दीबाहेर म्हणजे १२ नॉटीकल मैलांवर केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या सागरी क्षेत्रात पर्ससीन नेट फिशिंग पध्दतीने मासेमारी करतात.

पर्ससीन नेट मासेमारी करण्याची केंद्राची १ ऑगस्ट ते ३१ मेपर्यंत मासेमारी करण्याची मुभा आहे. मात्र राज्य सरकारकडूनच केंद्राच्या अखत्यारीतील १२ नॉटीकल मैलांवर मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कायद्याचा बडगा उगारीत आहे. त्याशिवाय पर्ससीन नेट फिशिंग पध्दतीने मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही राज्य सरकारने निर्बंध घातले आहेत.

पर्ससीन मासेमारीवर सरकारने बंदी घातली आहे. मात्र ही बंदी पर राज्यातील मच्छिमारांना नाही. त्यामुळे त्यांच्याकडून पर्ससीन पद्धतीने मासेमारी सुरू आहे. त्यामुळे कोकण किनारपट्टीवरील १ हजार २०० बोटी वर त्याच्या उपजीविका अवलंबून असलेल्या हजारो कामगारांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे शासनाने पर्सिसीन मासेमारी करणाऱ्यांना परवानगी द्यावी या मागणीसाठी १५ ऑगस्ट पासून मासेमारी बंद आंदोलन करणार असून दोन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात आमची लढाई सुरू आहे.

गणेश नाखवा, अध्यक्ष, वेस्ट कोस्ट पर्ससीन फिशरमेन वेल्फेअर असोसिएशन

### "विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे सरकारने लाडकी...

सरकारने हा निर्णय कुठल्या आधारे घेतला? हे चालणार नाही", असंही सुषमा अंधारे म्हणाल्या.

पुढे बोलताना, "सरकारने योजना राबवाव्यात. योजना राबवायला कुणाचाही विरोध नाही. मात्र, या योजना राबवताना, इतरांच्या हक्काचे पैसे त्यांना मिळालेच पाहिजे याची खात्री करावी", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

# भारतीय स्वातंत्र्याची ७७ वर्ष



आज आपण आपल्या देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. आजच्याच दिवशी ७७ वर्षापूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त झाला. त्यापूर्वी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज बघता बघता या देशाचे मालक बनले आणि कोट्यावधी भारतीयांना त्यांनी गुलाम बनवले. देश पारतंत्र्यात गेला. सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य केले. तेवढ्या काळात त्यांनी आपला इतिहास, आपला पराक्रम आपला स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम केले. ज्या देशात सोन्याचा धूर निघत होता त्या देशाला कंगाल करण्याचेच काम त्यांनी केले. देशातील नागरिकांना गुलामीची वागणूक दिली. गोरगरीब, सरळ साध्य मार्गाने जगणाऱ्या भारतातील नागरिकांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केला. इंग्रजांच्या या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेने इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव केला तो १८५७ साली. दुर्दैवाने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही तरी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना प्रेरणा देणारा हा उठाव ठरला. या उठावातूनच प्रेरणा घेऊन पुढे हजारो देशभक्त निर्माण झाले. काहींनी सशक्त क्रांतीने तर काहींनी अहिंसेच्या विधायक मार्गाने इंग्रजांशी लढा पुकारला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी हजारो क्रांतिकारांनी स्वत:चे रक्त सांडले, काही फासावर चढले तर काही इंग्रजांच्या गोळीने शहीद झाले. कित्येकांनी तुरुंगवास भोगला. काहींनी काळयापाण्याची तर काहींनी जन्मठेपेची शिक्षा भोगली. अशा कित्येक ज्ञात अज्ञात वीरांच्या बलिदानाने देश स्वातंत्र्य झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२ वाजता दिल्लीच्या लाल किल्यावर पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तिरंगा फडकवला आणि देशात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. देश स्वातंत्र्य होऊन आज ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. ७७ वर्ष हे कोणत्याही देशाचे मूल्यमापन करण्यासाठी तसा अतिशय कमी कालावधी पण इतक्या कमी कालावधीतही आपला देश जगातला सर्वाधिक प्रगत देश म्हणून ओळखला जात आहे. गेल्या ७७ वर्षात आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात भारताने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. जो देश सुई ही बनवू शकत नाही असे मानले जात होते तो देश आज चंद्रावर स्वारी करत आहे. भारताने घेतलेली ही गरुड झेप कोणालाही हेवा वाटेल अशीच आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीकडे पाहिले जाते. देश स्वातंत्र होऊन ७७ वर्ष उमटली तरी आपल्या लोकशाहीला अजून कशाचेही गालबोट लागले नाही. २६ जानेवारी १९५० पासून आपला देश प्रजासत्ताक बनला. भारताचे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान व्यक्तीने लिहिले. त्या संविधानानुसारच देशाचा कारभार चालू आहे. विविध, जाती, धर्म, पंथाचे लोक या देशात गुण्या गोविंदाने राहतात. प्रत्येक प्रांताची भाषा वेगळी, पेहराव वेगळा, संस्कृती वेगळी असे असले तरी भारतवासीय म्हणून सर्व एक आहोत हीच एकी आपली ओळख आहे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जाती, धर्माच्या १४५ कोटी लोकांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम आपल्या संविधानाने केले आहे. म्हणूनच भारतीय संविधानाला जगातील सर्वोत्तम संविधान असे समजले जाते. भारतासोबतच स्वातंत्र्य झालेल्या आपल्या शेजारील राष्ट्राची आज काय अवस्था आहे हे आपण पाहतोच आहे. अवघ्या ७७ वर्षात भारत एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास आले. जागतिक महासत्ता बनण्याकडे आपण पाऊले टाकत आहोत. प्रगतीची हीच घोडदौड अशीच चालू राहिली तर आगामी २३ वर्षात भारत जागतिक महासत्ता बनेल यात शंका नाही. देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या देशवासीयांना मनापासून शुभेच्छा! जय हिंद!! जय भारत!!!

श्याम ठाणेदार

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'इको बाप्पा मोबाईल अॅप'चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई :** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक गणेशोत्सवातील विविध जनजागृती उपक्रमांचा आरंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झाला.

पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची, सजावटीची व आभूषणांची वाढती मागणी लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांनी इको बाप्पा हे मोबाईल अॅप विकसित केले असून याचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाले. या मोबाईल अॅपच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्या कारखानदारांची ठिकाणे उपलब्ध होणार असून यामुळे पर्यावरणपूरक मूर्ती नागरिकांना खरेदी करणे सहज शक्य होणार आहे. 'इको बाप्पा' हा अॅप मोबाईल प्लेस्टोर मधून विनामूल्य डाऊनलोड करता येणार असून यामध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची खरेदी, आभूषणे, सजावटीचे साहित्य व विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची माहिती उपलब्ध होणार आहे. मंडळाने या वर्षीच्या पर्यावरणपूरक उत्सवाला चालना देण्यासाठी शहाणपण देगा देवा या संकल्पनेतून रेडिओ जिंगल्स्, व्हिडिओज् तयार केले असून एक लहान बालक पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याचा अभिनव संदेश यात देत आहे. याचा देखील आरंभ मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव डॉ.अविनाश ढाकणे हे उपस्थित होते तर विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्हिडिओ कॉन्फर्सिंगच्या माध्यमातून राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांच्या आयुक्त व मुख्याधिकारी यांच्याशी संवाद साधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी व्यापक जनाजगृती व उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मनसे नेते अविनाश जाधव यांना पोलिसांची नोटीस



**ठाणे** - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर नारळ फेकण्याचा प्रकार समोर आला होता. याप्रकरणी मनसे नेते अविनाश जाधव यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली आहे. तसेच त्यांना तपासकामी हजर राहण्याचे आदेश नोटीसमधून देण्यात आले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शनिवारी भगवा सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहासाठी उद्धव ठाकरे हे ठाण्यात आले होते. त्यांच्या वाहनांचा ताफा नितीन कंपनी परिसरात आला असता, मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्याच्या दिशेने नारळ फेकले होते. या घटनेनंतर मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी समाजमाध्यमांवर एक चित्रीकरण प्रसारित केले. तसेच हल्ला मनसेच्या कार्यकर्त्यांनी केल्याचे म्हटले होते. त्यानंतर अविनाश जाधव यांच्यासह नारळ फेकणाऱ्या मनसेच्या कार्यकर्त्यांविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, नौपाडा पोलिसांनी अविनाश जाधव यांना नोटीस बजावून त्यांना तपासकामी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

# "सामान्य लोकं कसे असामान्य झाले" या विषयावर मार्गदर्शन

**कल्याण :** आसरा फाऊंडेशनच्या वतीने राहुल शिक्षण प्रसारक मंडळ आणि ए आर कार्गो मुव्हर्स यांच्या सहयोगाने एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा विषय होता, "सामान्य लोक कसे असामान्य झाले". या व्याख्यानात सेवानिवृत्त आयआरएस व कस्टम्स विभागाचे लोकपाल हृषिकेश शरण यांनी आपले अनुभव मांडले. या कार्यक्रमात शिक्षक तज्ञ डॉ. जी के डोंगरगावकर, इंटरनॅशनल ट्रेनर लाईफ कोच पवित्रा सावंत आणि आसरा समूहाचे संस्थापक मोहन शिरकर यांची उपस्थिती होती.




हृषिकेश शरण यांनी आपल्या व्याख्यानातून सर्वसामान्य माणसाने कसे आपल्या आयुष्यात उंचावटा गाठू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे सांगितले की, दृढ इच्छाशक्ती, कठोर परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर प्रत्येकजण आपल्या आयुष्यात यशस्वी होऊ शकतो. सदर कार्येक्रमात आसरा मुक्तांगण च्या ऑगस्त 2024 चा 'बाल साहित्य' या विशेषांकाचे प्रकाशन हृषिकेश शरण यांच्या हस्ते करण्यात आले.

आसरा फाऊंडेशनचे सदस्य दिनेश सिंह यांनी यावेळी सांगितले की, अशा प्रकारची व्याख्याने भविष्यातही आयोजित करण्यात येतील. या व्याख्यानांचा उद्देश सर्वसामान्य लोकांमध्ये प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना आपल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

# पनवेलमध्ये १२ हजार हेक्टर भातशेती हद्दपार



**पनवेल :** पनवेल तालुक्यातील गावांचे रूपांतर विकसनशील शहरामध्ये होत असल्यानेमागील वर्षीच्या तुलनेत यापुढे तालुक्यातील सहा हजार हेक्टरवरील भातशेती नष्ट होण्याच्या वाटेवर आहे. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येसाठी पर्याय म्हणून नवी मुंबईनंतर पनवेलचा शहर म्हणून विकास केला जात आहे. निवासी व औद्योगिक वापरासाठी पालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना विकासक होण्याची संधी मिळाली असली तरी पारंपरिक शेतीवर पाणी सोडण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांना प्रारूप आराखड्याबद्दल हरकती व सूचना नोंद करण्यासाठी पालिकेने ८ सप्टेंबरपर्यंत वेळ दिली आहे. दहा वर्षांपूर्वी १५ हजार हेक्टरवर भातशेती केली जात होती. यंदा सहा हजार हेक्टरवर भातपीक घेतले आहे. पनवेल महापालिकेने आगामी २० वर्षांत वाढत्या लोकसंख्येचा अंदाज धरून शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार केला असून यातील १२ हजार हेक्टर शेतजमिनीपैकी ७० टक्के जमिनींवर निवासी क्षेत्राचे आरक्षण करण्यात आले आहे. पालिका क्षेत्रातील १८ गावांवर या आराखड्याचा थेट प्रभाव पडणार असल्याने याचे सामाजिक व राजकीय दीर्घ परिणाम येथील ग्रामस्थांवर होणार आहेत. १२ हजार हेक्टर शेतजमिनींचे राखणदार असलेल्या शेतकऱ्यांना पनवेलच्या विकासात स्वत:चे राहणीमान उंचावण्याचीही संधी मिळेल, पण पारंपरिक शेती काही वर्षांत पनवेलमधून हद्दपार होणार आहे.

# सीएसएमटी – दिवा लोकलसाठी दिवेकरांचे हाताला काळ्या फिती बांधून आंदोलन




**दिवा** - दिवा ते सीएसएमटी रेल्वे सेवा आणि कोकणात जाणाऱ्या गाड्यांना दिव्यात थांबा मिळावा यासाठी बुधवारी सकाळी दिव्यातील प्रवाशांनी हाताला काळया फिती बांधून आंदोलन केले. तसेच दिवा-सीएसएमटी रेल्वे सेवा सुरू झालीच पाहीजे अशी मागणी केली. त्यानंतर प्रवाशांनी काळया फिती बांधून प्रवास केला. आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या रेल्वे प्रशासनाच्या निषेधासाठी काळया फिती बांधल्याचे प्रवाशांनी सांगितले.

ठाणे शहरालगत असलेल्या दिव्यात परवडणारी घरे मिळत असल्याने दिव्यात घर घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे दिवे शहरातील लोकसंख्या देखील वाढली आहे. हजारो प्रवासी दररोज दिवा ते ठाणे, मुंबई असा रेल्वे प्रवास करत असतात. दिवा स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेकदा रेल्वेगाड्यामध्ये शिरणे शक्य होत नाही. काही जलद रेल्वेगाड्यांना दिवा स्थानकात थांबा आहे. परंतु येथील प्रवाशांना या गाड्यांमध्ये प्रवेश करू दिले जात नसल्याची ओरड आहे. त्यामुळे दिव्यातील प्रवाशांचे इतर प्रवाशांसोबत वादाचे प्रसंग देखील उद्भवतात. जून महिन्यात समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ प्रसारित झाला होता. दिवा स्थानकातून प्रवाशांनी रेल्वेगाडीत चढू नये म्हणून एका डब्याचे दार बंद करण्यात आले होते. तर, सुमारे वर्षभरापूर्वी रेल्वे गाडीत प्रवेश मिळाला नाही म्हणून महिलांनी रेल रोको करण्याचा प्रयत्न केला होता.

# जुनी डोंबिवलीत पायवाट बंद करून बांधलेल्या बेकायदा इमारतीत गाळ्यामधून प्रवेशद्वार

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील जुनी डोंबिवलीत अग्निदेव मंदिराच्या बाजुला पायवाट बंद करून भूमाफियांनी सात माळयाची बेकायदा इमारत उभारली आहे. या इमारतीला सामासिक अंतर नाही. इमारतीत जाण्यासाठी समोर प्रशस्त जागा नसल्याने भूमाफियाने एका गाळयामधून रहिवाशांना इमारतीत येजा करण्यासाठी रस्ता ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला आहे.



ही बेकायदा इमारत सात माळयाची असुनही या इमारतीला पाच माळयापर्यंत उद्ववाहनची सुविधा करण्यात आली आहे. जुनी डोंबिवलीतील विघ्नेश्वर कृपा आणि उदयराज या अधिकृत इमारतींच्या मध्यभागी पायवाट बंद करून प्रकाश गोठे, शंकर ठाकूर या भूमाफियांनी या बेकायदा इमारतीची उभारणी केली आहे. या बेकायदा इमारतीमधील सदनिका २८ ते ३५ लाख रूपयांना नोटरी पध्दतीने घर खरेदीदारांना विकण्यात येत आहेत. या बेकायदा इमारतीला कल्याण डोंबिवली पालिकेची बांधकाम परवानगी आहे, अशी खोटी माहिती घर खरेदीदारांना देऊन भूमाफिया या बेकायदा इमारती मधील घरे खरेदीदारांना विकून त्यांची फसवणूक करत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

गेल्या दीड वर्षापासून जुनी डोंबिवली अग्निदेव मंदिराजवळील विघ्नेश्वर कृपा आणि उदयराज या अधिकृत इमारतींच्या मध्यभागी पायवाट बंद करून, गटार तोडून ही बेकायदा प्रकाश गोठे, शंकर ठाकूर या भूमाफियांनी उभारली आहे. या इमारतीमधील सांडपाणी, मलनिस्सारण वाहिन्या लगतच्या पालिकेच्या मुख्य जलवाहिनीला नियमबाह्य जोडण्यात आल्या आहेत. जुनी डोंबिवलीतील रहिवाशांच्या मोटारी, दुचाकी या पायवाटेवरून जायच्या. या बेकायदा रहिवाशांचा रस्ता बंद झाला आहे. या इमारतीत काही दुर्घटना घडल्यास अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका या भागात येण्यास जागा नाही. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी ह प्रभाग साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांना ही बेकायदा इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश देण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

या बेकायदा इमारतीत पूर्ण क्षमतेने रहिवास सुरू झाला की परिसरातील पाणी पुरवठ्यावर परिणाम होऊन या भागात पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची भीती या भागातील रहिवाशांनी व्यक्त केली. या बेकायदा इमारतीवर कारवाई केली नाहीतर हे प्रकरण उच्च न्यायलायत दाखल करण्यात येऊन ही बेकायदा इमारत भुईसपाट करण्याची मागणी केली जाईल, असे तक्रारदाराने सांगितले. ह प्रभागात रेतीबंदर चौकात तीन बेकायदा इमारती, राहुलनगरमध्ये रमाकांत आर्केड, सुदामा रेसिडेन्सी, ठाकुरवाडीत शिवलिला, कुंभारखाणपाडा शिव सावली, कोपर रेल्वे स्थानकाजवळ कोंबड्यांचा खुराडा, कोपरमध्ये सखारामनगर कॉम्पलेक्स जवळ आरक्षित भूखंडावर तीन बेकायदा इमारती, कोपर स्मशानभूमी रस्त्यावर बेकायदा इमारती उभ्या आहेत.

# पर्यावरणपूरक गणेश मूर्तिकारांना अनुदानाची प्रतीक्षा कायम



**उरण :** गणेशोत्सवाला अवघा महिना उरला असून गणेश मूर्तिकारांची लगबग सुरू आहे. शासनाने शाडूच्या पर्यावरणपूरक मूर्ती बनविण्याची व पर्यावरण राखण्याची घोषणा केली आहे. मात्र शेकडो वर्षे शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान न देता सरकार उपेक्षा करीत आहे, तर दुसरीकडे शाडूच्या मातीच्या किमतीतही १५ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्यांना अनुदानाची प्रतीक्षा आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ लाखो रुपये खर्च करीत आहे. मात्र मूर्तिकार अनुदानापासून वंचित आहेत. शंभर वर्षांपासून सुंदर, सुबक व देखण्या शाडूच्या मूर्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या चिरनेर, कुंभारपाडा, जासईसह अनेक गावांतील गणेशमूर्तींची कामे वेगाने सुरू आहेत. अनेक मूर्तिकार रात्रंदिवस या कामात व्यस्त आहेत.

# उल्हासनगरमध्ये गणपती आगमन मिरवणुकीची परवानगी न घेणाऱ्या गणेशोत्सव मंडळावर गुन्हा

**कल्याण:** उल्हासनगरमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गणपती आगमन मिरवणुकीची परवानगी न घेता रविवारी मिरवणूक काढली. मिरवणुकीमुळे शहरात वाहतूक कोंडी झाली. तसेच कर्णकर्कश वाद्ये वाजवून सर्वोच्च न्यायालयाच्या आणि ठाणे पोलीस आयुक्तांच्या आदेशाचा भंग केल्याने उल्हासनगर पोलिसांनी संबंधित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षांसह इतर पदाधिकाऱ्यांवर सोमवारी गुन्हा दाखल केला आहे. सेव्हन स्टार मित्र मंडळ असे गुन्हा दाखल मंडळाचे नाव आहे. या मंडळाचे अध्यक्ष राकेश मनसुखभाई पटेल (३२), उपाध्यक्ष रवी लालचंद आहुजा (३१) आणि मंडळाच्या इतर पदाधिकाऱ्यांवर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु ताम्हाणे यांच्या आदेशावरून हवालदार अशोक बारगजे यांच्या तक्रारीवरून महाराष्ट्र पोलीस अधिनियमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, उल्हासनगरमध्ये सेव्हन स्टार मित्र मंडळातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला होता.



या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष राकेश पटेल यांच्या सूचनेवरून रविवारी गणपती कारखान्यातून आपली मखरात प्रतिष्ठापना करण्यात येणारी मूर्ती आणण्याचा निर्णय घेतला. ही मूर्ती वाजतगाजत नेण्यात येणार असल्याने सेव्हन स्टार मित्र मंडळाने पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु, सेव्हन स्टार मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांची परवानगी नाहीच, पण पोलिसांना अंधारात ठेऊन रविवारी संध्याकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत शहरातील मुख्य रस्त्यांवरून गणपती आगमनाची मिरवणूक काढली. ऐन गर्दीच्या संध्याकाळच्या वेळेत ही मिरवणूक काढण्यात आल्याने शहरातील मुख्य, अंतर्गत रस्त्यांवर तुफान वाहन कोंडी झाली. या मिरवणुकीत ढोल, ताशे, ब्रास बॅन्ड आणि इतर वाद्ये कर्णकर्कश, आवाजाची मर्यादा ओलांडून वाजवली जात होती. उल्हासनगर पोलीस आणि वाहतूक पोलिसांची अचानक ही मिरवणूक रस्त्यावर आल्याने तारांबळ उडाली. वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची दमछाक झाली. अखेर नियमबाह्य कृती करून सेव्हन स्टार मित्र मंडळाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन, ठाणे पोलीस आयुक्तांच्या पाचपेक्षा अधिक व्यक्तिंनी विनापरवाना एकत्र येणे या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून उल्हासनगर पोलिसांनी सेव्हन स्टार मित्र मंडळा विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# वाळूमिश्रित रस्ते उकरण्याची पालिकेवर नामुष्की!



**नवी मुंबई :** शहराच्या विविध विभागांत पावसाळापूर्व कामांच्या नावाखाली अनेक रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. परंतु दर्जाहीन कामामुळे एक-दीड महिन्यात हे रस्ते उखडल्याचे चित्र पाहायला मिळत असून पालिकेला ठेकेदाराने डांबरीकरणात चक्क वाळू भरल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पालिकेला अशा रस्त्यावरील वाळू उकरून बाहेर काढण्याची नामुष्की ओढवली आहे. तर त्यापुढे याच रस्त्यावर नव्याने निव्वळ डांबराचा मुलामा दिल्यामुळे सायकल, दुचाकी घसरून नेरुळ येथे दोन शाळकरी मुले जखमी झाल्याचे पाहायला मिळाले. रस्ता दुरुस्त केल्यावर किंवा त्याचे डांबरीकरण केल्यावर त्याला निश्चित असा दोष निवारण कालावधी ठरलेला असतो. त्यामुळे एक-दीड महिन्यात रस्ता पूर्ण उखडून जात असेल तर त्या ठेकेदारावर पालिका कधी कारवाई करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. खड्डे बुजवण्यासाठी देण्यात येणाऱ्या कंत्राटामध्ये पारदर्शकता नसल्यानेच असे प्रकार घडत असल्याने असे प्रकार समोर येत आहेत. महापौर निवास असलेल्या पारसिक हिलवरील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम याच मे महिन्याच्या अखेरीस करण्यात आले. परंतु, पावसाळयाच्या अर्ध्या कालावधीतच चक्क रस्त्यावरील डांबर व खडी वाहून गेली असून मागील दोन दिवस पुन्हा रस्ता करण्यासाठी रस्त्यावरील खडी बाजूला करण्याचे काम करण्यात येत आहे.

# आदिवासी पाडे अजुनही अंधारात सामाजिक कार्यकर्तें सोमनाथ राऊत यांनी व्यक्त केली खंत

**कल्याण :** युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था, दहिवली यांच्या वतीने नुकताच जागतिक आदिवासी दिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत यांनी आदिवासी पाड्यात आजही खुप समस्यांना सामोरे जावे लागते असे सांगितले.



आजही आदिवासी भागात पक्के घरे नाहीत, रस्ते, शौचालय नाहीत मुलभूत गोष्टींसाठी भटकंती करावी लागते असे सांगितले. शासकीय कागदपत्रे नसल्याने शासकीय योजनापासून हे घटक वंचित राहतात त्याचबरोबर बालमजुरी, व्यसने, अंधश्रद्धा, बालविवाह यांचे प्रमाण वाढत असल्याने आदिवासी समाज अंधारात आहे. या कार्यक्रमात युवा संस्कार संस्थेच्या मुलांनी गाणे, वेशभुषा, भाषण, नृत्य असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. युवा संस्कार संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील १० वी, १२ वी व १५ वी पास झालेल्या व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्हा संघटक रविंद्र गुरचळ यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या पालक वर्गाला नशा आपल्याला कशी हानी करत आहे ह्यांवर समाजप्रबोधन केले. युवा संस्कार युट्यूब चैनलचे गायक तुकाराम हिलम व धम्मादास अरवेल यांने आपल्या गायनातुन यावेळी मुलांचे मनोरंजन केले. कार्यक्रमासाठी दहिवली, बेलपाडा, कुंदे, म्हसकल, म्हसरुंडी, मामनोली व बांगरवाडी गावातील महिलां वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात राठोड गायन ग्रुप यांनी मुलांच्या मनोरंजनासाठी देशभक्ती व भक्तीगीत सादर केले. नशाबंदी महामंडळ ठाणे

कार्यक्रमासाठी कमलाकर राऊत, संजय मुकने, वासुदेव वाघे, दिनेश वाघे, रविंद्र गुरचळ, गोपाळभाऊ राठोड, डॉ. जयेश राठोड, डॉ. वर्षा राठोड, मिलिंद बच्छाव, हेमा बच्चव, डॉ. मीता पाटील, अलका लखानी आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुलांचे शिक्षण व उदरनिर्वाहासाठी 'आईने' स्वीकारला चोरीचा मार्ग

**कल्याण :** आपल्या पतीने आपणास व चार मुलांना वाऱ्यावर सोडून बे दखल करीत दुसरे लग्न केल्याने मुलांचा उदरनिर्वाह व शिक्षण कसे करायचे असा सतत भेडसावणारा प्रश्न त्या महिलेला सतावित होता. मात्र यावर रामबाण उपाय शोधीत झटक्यात पैसे मिळतील या हेतूने शिक्षणाचा व उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागेल या हेतूने तिने चोरीला प्राधान्य दिले. मात्र चैन स्नॅचिंग प्रकरणात पोलिसांच्या ती हाती लागल्याची घटना कल्याण रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये उघडकीस आली आहे.



औरंगाबाद येथे राहत असणारी राणी भोसले यांना तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. काही वर्षांपूर्वी पतीने तिच्यापासून वेगळे राहण्याचा निर्णय घेऊन दुसरे लग्न केले होते. त्यामुळे मुलांच्या पालन पोषणाची शिक्षणाची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली. सुरुवातीच्या काळात हाती लागेल ते काम राणी करू लागली. मात्र दरम्यानच्या काळात ती आजारी पडली उपचाराकरिता ती मुंबईत आली आणि उपचार सुरू ठेवले. कल्याण जवळील विठ्ठल वाडी येथे राणीचा भाऊ राहत असल्याने ती औषध आणण्यासाठी मुंबईला ये जा करू लागली.

या दरम्यान बारावीत शिकणाऱ्या तिच्या मुलाने 10 ऑगस्ट रोजी तिला फोन करीत कॉलेजची फी ची पूर्तता न केल्यास कॉलेजमधून काढून टाकण्याचे सांगितले. मुंबईहून रेल्वे प्रवास करीत कल्याण स्थानकापर्यंत आली. मात्र फी चे पैसे कसे जमवायचे असा विचारात होती. कल्याण शहाड रेल्वेदरम्यान गर्दीचा फायदा घेत एका महिलेची चैन राणीने लंपास करीत विठ्ठलवाडीला गेली. मात्र चैन लांबविल्याने महिलेने रेल्वे पोलिसांकडे याबाबत तक्रार केली सीसीटीव्ही च्या फुटेज मध्ये पोलिसांना तोंडाला स्कार्फ घातलेली महिला निदर्शनास आली. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी महिलेचा शोध सुरू केला.

सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत असलेल्या महिलेच्या घरापर्यंत कल्याण रेल्वे पोलीस पोहोचत पोलीस पथकाने त्या महिलेला ताब्यात घेतले. राणीला अटक केल्यानंतर चोरलेली चैन पोलिसांच्या ताब्यात दिली. पोलिसांनी तिला बोलती केल्यानंतर मुलांच्या शिक्षणासाठी व उदरनिर्वाह करिता आपण चोरीचा मार्ग अवलंबिला असल्याचे तिने सांगितल्याने पोलीसही गहिवरले. पैशांकरिता मुलांच्या शिक्षणामध्ये अनियमितता पडू नये याकरिता राणीने मात्र चोरीचा अवलंब करीत आत्तापर्यंत तिने सहा ते सात चोऱ्या केल्याची माहिती कल्याण रेल्वे पोलिसांनी दिली आहे. कल्याण रेल्वे पोलीस स्टेशनचे सीनियर पोलीस इन्स्पेक्टर पंढरीनाथ का यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# भारताचा सुवर्णपदक विजेता बॅडमिंटन खेळाडू निलंबित

## सीएएस ने याचिका फेटाळल्याने पॅरिस पॅरालिम्पिकचं स्वप्न भंगलं

**पॅरिस ऑलिम्पिक २०२४ नंतर पॅरालिम्पिक खेळांना काही दिवसांनी सुरूवात होणार आहे. पॅरालिम्पिक खेळ २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत पॅरिसमध्ये होणार आहे. पण या पॅरालिम्पिक खेळांपूर्वी भारताला एक मोठा धक्का बसला आहे. टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारतासाठी सुवर्णपदक जिंकणारा बॅडमिंटनपटू प्रमोद भगत यंदाच्या पॅरालिम्पिकमध्ये खेळणार नाही, याची घोषणा बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनने केली आहे.**



भारताचा टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता प्रमोद भगतने डोपिंग नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १८ महिन्यांसाठी त्याला निलंबित करण्यात आल्याची घोषणा बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनने केली आहे. पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत तो सहभागी होणार नाही. "टोकियो २०२० पॅरालिम्पिक चॅम्पियन प्रमोद भगतला १८ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे आणि तो पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक गेम्समध्ये देखील सहभागी होणार नाही," BWF ने एका निवेदनात म्हटले आहे. प्रमोद भगत वर्षभरात तीनवेळा स्वत:चा ठावठिकाणा सांगू शकला नाही. याप्रकरणी दोषी आढळल्याने त्याला निलंबित करण्यात आले आहे. "१ मार्च २०२४ रोजी, आंतरराष्ट्रीय क्रीडा लवाद डोपिंग विरोधी विभागाने भगत यांना १२ महिन्यांत तीन वेळा ठावठिकाणा सांगू न शकल्याने BWF अँटी-डोपिंग नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळले." प्रमोद भगत यांनी अपील करूनही, सीएएस अपील विभागाने निलंबन कायम ठेवत निर्णय बदलला नाही. ॲथलीट भगत पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक गेम्समध्ये सहभागी होणार नाही. "२९ जुलै २०२४ रोजी सीएएस अपील विभागाने भगत यांचे अपील फेटाळले.

प्रमोद भगतने या वर्षाच्या सुरुवातीला थायलंडच्या पटाया येथे २०२४ पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये इंग्लंडच्या डॅनियल बेथेलला एका तगड्या लढतीत पराभूत करून पुरुष एकेरीच्या SL3 चे विजेतपद कायम ठेवले. ३५ वर्षीय भगतने एक तास ४० मिनिटे झालेल्या सामन्यात प्रतिस्पर्ध्याचा १४-२१, २१-१५, २१-१५ असा पराभव केला. भगतचे हे चौथे एकेरीचे जागतिक विजेतपद होते. याआधी त्याने २०१५, २०१९ आणि २०२२ मध्ये तीन वेळा हेच पदक जिंकले होते. २०१३ च्या जागतिक स्पर्धेत त्याने पुरुष दुहेरीचे सुवर्णपदकही जिंकले आहे.


## रिंकू राजगुरूला 'या' कारणामुळे वडिलांनी काढलं होतं घराबाहेर

सैराट' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या मनात मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणारी अभिनेत्री म्हणजे रिंकू राजगुरू होय. आर्ची या भूमिकेतून तिने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले होते. आजही तिची आर्ची ही ओळख कायम आहे. आता मात्र तिने एका मुलाखतीदरम्यान तिच्या वडिलांनी तिला घराबाहेर काढले होते, असे वक्तव्य केल्यामुळे सध्या ती चर्चांचा भाग बनली आहे. रिंकू राजगुरूने नुकतीच 'व्हायफळ' या युट्यूब पॉडकास्टला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये तिने आपल्या खासगी आयुष्यातील अनेक गोष्टींवर वक्तव्य केले आहे. बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यावेळी तिने तिच्या वडिलांनी तिला घराबाहेर काढले होते, अशी आठवण सांगितली आहे. सायकलवरुन ती कुठे दुर गेली आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना रिंकू म्हणते की, मी चौथी-पाचवीला असेन, मला आता आठवत नाही. पण मी सायकल चालवत माझ्या मैत्रीणीकडे गेले आणि तिथेच खेळत बसले. खेळता-खेळता मला कळालंच नाही. अंधार झाला होता. साडे सात वाजून गेले असणार, तेवढ्यात मला माझ्या वडिलांच्या गाडीचा आवाज आला. बाबा आले, मला म्हणाले कुणाला विचारुन आली होतीस. मी सॉरी म्हटलं. बाबा म्हणाले, लगेच घरी जायचं. मग मी रडत रडत सायकलवर पुढे आणि माझ्या पाठीमागे माझे बाबा, असे आम्ही घरी आलो. बाबांनी गेट लावलं आणि म्हणाले, "मी तुला घरात घेणार नाही". मी खूप रडले. पण त्यांनी काही मला घरात घेतलं नाही. मी बाहेर होते. शेजारच्या काकू म्हणाल्या, "काय झालं गं?" मी त्यांना सांगितलं, "मला घराच्या बाहेर काढलं." त्या म्हणाल्या, "आमच्या घरी ये." मी त्यांच्या घरी गेले, जेवण केलं, निवांत बसले. बाबा आले आणि म्हणाले, "चला घरी, जेवायचं आहे ना?" मी त्यांना म्हटलं, मी जेवले. पण घरी चला."अशी आठवण रिंकूने या पॉडकास्टवेळी सांगितली आहे.

## नेत्रदीपक सोहळ्यासह ऑलिम्पिकला अलविदा

भव्य 'स्टाड डे फ्रान्स' स्टेडियमला रविवारी एखाद्या मोठ्या 'कॉन्सर्ट हॉल'चे स्वरूप प्राप्त झाले होते. जगभरातील अलौकिक क्रीडा गुणवत्तेच्या गेल्या १५ दिवसांतील प्रदर्शनानंतर नेत्रदीपक आणि चित्तथरारक समारोप सोहळयाने पॅरिस ऑलिम्पिकवर पडदा पडला आणि वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी ऑलिम्पिकचा ध्वज लॉस एंजलिसकडे सोपविण्यात आला.

दोन आठवड्यांपूर्वी सेन नदीवर झालेल्या नावीन्यपूर्ण आणि ना-भूतो अशा उद्घाटन सोहळयात फ्रान्सच्या स्थापत्यकलेचे आणि देशाच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडले होते. समारोपाची संध्याकाळही अशीच मंत्रमुग्ध करणारी होती.



समारोप सोहळयाची सुरुवात 'मार्सी पॅरिस'ने झाली. या फ्रेंच शब्दाचा अर्थ 'आभारी' असा आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत सर्वाधिक चार सुवर्णपदके जिंकणारा फ्रान्सचा जलतरणपटू लेऑन मारशॉने मैदानात प्रवेश केला आणि १५ दिवस एका फुग्यात तेवत असणारी ऑलिम्पिक ज्योत शांत करण्यात आली आणि समारोप सोहळयास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. स्पर्धेत सहभागी झालेल्या २०५ देशांच्या ध्वजवाहकांनी भव्य स्टेडियममध्ये कोरलेल्या जगाच्या नकाशावर प्रदक्षिणा घातली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे अध्यक्ष थॉमस बाख यांनी ऑलिम्पिक स्पर्धांचा समारोप झाल्याचे जाहीर करताना सहभागी खेळाडूंसह स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या स्वयंसेवकांचे आभार मानले. यानंतर पॅरिसच्या महापौर ॲन हिडाल्गो यांनी लॉस एंजलिस शहराचे महापौर कॅरेन बास यांच्याकडे ऑलिम्पिक ध्वज सुपूर्द केला. अमेरिकेतील लॉस एंजलिसमध्ये पुढील म्हणजेच २०२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धा रंगणार आहेत. समारोप सोहळयाची सुरुवात प्रसिद्ध फ्रेंच गायक झाहो डी सागाझान यांनी गायलेल्या 'सुस ले सिएल डी पॅरिस' या गाण्याने झाली. त्यानंतर सर्व सहभागी २०५ देशांच्या ध्वजवाहकांनी मैदानात प्रवेश केला.

## नीरज चोप्रा ऑलिम्पिकनंतर भारतात परतण्याऐवजी जर्मनीला रवाना

भारताचा गोल्डन बाय नीरज चोप्रा पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये नीरज चोप्रा रौप्य पदक पटकावले. टोकियो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता यंदाही सुवर्णपदक जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार होता. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये रात्री झालेल्या भालाफेकच्या अंतिम फेरीत अर्शद नदीमने ९२.९७ मीटर विक्रमी फेक करून सुवर्णपदक पटकावले, तर नीरजने रौप्यपदक पटकावले होते. अंतिम सामन्यानंतर नीरजने खुलासा केला की, तो मांडीच्या दुखापतीमुळे या सामन्यात त्रस्त होता आणि आता त्याच्यावर शस्त्रक्रियेची गरज भासू शकते. त्यामुळे पॅरिस ऑलिम्पिक संपताच नीरजने एक मोठा निर्णय घेतला आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकल्यानंतर नीरज चोप्रा जर्मनीला रवाना झाला आहे. रिपोर्टनुसार, शस्त्रक्रियेबाबत वैद्यकीय सल्ला घेण्यासाठी आणि आगामी डायमंड लीग स्पर्धांमध्ये भाग घ्यायचा की नाही हे ठरवण्यासाठी तो जर्मनीला गेला आहे. ऑलिम्पिकपूर्वी नीरजला मांडीच्या आतील स्नायूंचा त्रास होत होता. सामन्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्याने खुलासा केला की, त्याच्या या दुखापतीवर शस्त्रक्रियेची गरज भासू शकते, म्हणून तो लवकरच डॉक्टरांकडे जाणार आहे. काही काळासाठी त्याला मैदानापासून दूर राहावे लागणार आहे. तो काही काळ कोणत्याही स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. पीटीआयच्या वृत्तानुसार, एका नीरजच्या कुटुंबाशी संबंधित एका सूत्राने सांगितले की, नीरज चोप्रा जर्मनीला रवाना झाला आहे. किमान महिनाभर तरी तो भारतात परतण्याची शक्यता नाही. पॅरिसमधील भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या सूत्रांनीही चोप्रा जर्मनीला रवाना झाल्याचे सांगितले आहे. तो जर्मनीतील डॉक्टरांचा सल्ला घेईल. नीरजने यापूर्वी जूनमध्ये फिनलँडमध्ये झालेल्या पावो नुर्मी गेम्समधील विजयानंतर सांगितले होते की, दुखापतीचा सामना करण्यासाठी तो डॉक्टरांशी चर्चा करणार आहे.



## दुलीप ट्रॉफीसाठी चार संघ जाहीर!



दुलीप ट्रॉफीच्या नवीन हंगामासाठी संघ जाहीर करण्यात आले आहेत. ५ सप्टेंबरपासून सुरु होणाऱ्या या स्पर्धेत एकूण चार संघ सहभागी होत आहेत. बीसीसीआयने सर्व संघ आणि कर्णधारांची घोषणा केली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीही या स्पर्धेत खेळतील अशी अपेक्षा होती, पण त्यांची नावे कोणत्याही संघात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. इतकेच नाही तर आणखी काही खेळाडू आहेत, जे सतत टीम इंडियासाठी खेळत आहेत, पण त्यांची नावे दुलीप ट्रॉफीसाठी निवडण्यात आलेल्या संघात नाहीत.

## कॉमेडियन मुनव्वर फारुकीने कोकणी माणसाची मागितली माफी

मुंबईतील एका स्टँडअप कॉमेडी कार्यक्रमादरम्यान कॉमेडियन मुनव्वर फारुकीनं कोकणी माणसांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यामुळं राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. त्याच्याविरोधात भाजपा आमदार नितेश राणे देखील आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर आता मुनव्वरनं सगळ्यांची जाहीर माफी मागितली आहे.

स्टँडअप कॉमेडियन मुनव्वर फारुकीनं कोकणी माणसांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर त्याचे पडसाद सर्वत्र उमटले.



मराठी माणसाचा आणि कोकणी लोकांचा दणका पाहता अखेरकार मुनव्वर फारुकीला माफी मागावी लागली. याबाबत भाजपा नेते, आमदार नितेश राणे त्याचबरोबर शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांनी आवाज उठवला होता. स्टँडअप कॉमेडियन मुनव्वर फारुकीनं कोकणी माणसांबाबत एका शोमध्ये वादग्रस्त विधान केलं होतं. त्याचे पडसाद सर्वत्र उमटले. मुनव्वर फारुकीच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर आमदार नितेश राणे आक्रमक झाले होते. "या फारुकी नावाच्या हिरव्या सापाला घरी जाऊन कोकणातले लोक कशी असतात हे सांगायला लागेल. त्यानंतर हा स्टॅण्डअपपण मालवणीत सुरू करेल", असा इशारा नितेश राणे यांनी दिला होता.

## दिनविशेष

### घटना

२०२२: अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (All India Football Federation) - FIFA ने अखिल भारतीय फुटबॉल महासंघाला तृतीय पक्षाच्या हस्तक्षेपाबाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पूर्णपणे निलंबित केले.
१९८८ : मिले सूर मेरा तुम्हारा दूरदर्शनवरून पहिल्यांदाच प्रसारित झाले.
१९८२: भारतात रंगीत दूरचित्रवाणीच्या प्रसारणास सुरुवात झाली.
१९७५ : बांगलादेशमध्ये लष्करी उठाव. शेख मुजीबुर रहमान कुटुंबीयांची हत्या.
१९७१: अमेरिकन डॉलरचे सोन्याशी असलेले संधान खंडित झाले...
१९६०: काँगो देश फ्रांसपासून स्वतंत्र झाला.
१९४८ : दक्षिण कोरिया या देशाची निर्मिती झाली.
१९४७ : पं. नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले.

### जन्म

१९९२ : भास्करन आडहान भारतीय बुद्धिबळपटू
१९७५ : विजय भारद्वाज भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९७१ : अदनान सामी भारतीय गायक आणि संगीतकार पद्मश्री
१९७० : राज कौशल भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते ( निधन: ३० जून २०२१)
१९६४ : मेलिंडा गेट्स - बिल & मेलिंडा गेट्स फाऊंडेशनच्या सह संस्थापिका
१९६४ : श्रीहरी - भारतीय अभिनेते (निधन: ९ ऑक्टोबर २०१३)
१९६१ : सुहासिनी मणिरत्नम भारतीय अभिनेत्री आणि पटकथालेखक
१९५८ : सिंपल कपाडिया - अभिनेत्री आणि वेशभूषाकार (निधन: १० नोव्हेंबर २००९)
१९४९ : सिद्धरामय्या - कर्नाटकचे २२वे मुख्यमंत्री
१९४७ : राखी गुलझार - चित्रपट अभिनेत्री
१९४५ : बेगम खालेदा झिया बांगला देशच्या पंतप्रधान
१९३०: स्वामी दयानंद सरस्वती - भारतीय भिक्षू आणि तत्त्वज्ञ (निधन: २३ सप्टेंबर २०१५ )

### निधन

२००५: बँडापुडी वेंकट सत्यनारायण भारतीय त्वचाशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक (जन्म: ३० जानेवारी १९२७)
२००४: अमरसिंग चौधरी गुजरातचे ८वे मुख्यमंत्री (जन्म: ३१ जुलै १९४१)
१९७५ : शेख मुजीबुर रहमान बांगलादेशचे संस्थापक व पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७ मार्च १९२०)
१९७४ : स्वामी स्वरुपानंद (जन्म: १५ डिसेंबर १९०३)
१९४२ : महादेव देसाई - स्वातंत्र्य लढ्यातील नेते (जन्म: १ जानेवारी १८९२ )
१९३५ : विल रॉजर्स अमेरिकन अभिनेते
१९३५: विली पोस्ट - अमेरिकन वैमानिक आणि जगाची परिक्रमा एकट्याने उड्डाण करणारे पहिले वैमानिक. (जन्म: २२ नोव्हेंबर १८९८)

## राशि भविष्य

**मेष** — इतरांवर टीका करण्यात तुमचा वेळ वाया घालवू नका, त्याने तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या. त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा, तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना कळू शकेल.

**वृषभ** — येणारा काळ हा खूप चांगला आहे, त्यासाठी उल्हसित राहा, त्यातूनच तुम्हा आधिक ऊर्जा मिळेल. अनपेक्षित स्रोतांद्वारे तुमची मिळकत होईल. आपल्या पालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आणि काळजी घेण्याची गरज भासेल.

**मिथुन** — मानसिक भीतीने तुम्ही घाबरून जाल. सकारात्मक विचार आणि उजळ बाजू विचारात घेतली तर भीती दूर लोटू शकाल. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो.

**कर्क** — सर्वसाधारणपणे आरोग्य चांगले असेल, पण प्रवास कटकटीचा आणि तणावपूर्ण ठरेल. आर्थिक व्यवहार आणि वायदे अतिशय काळजीपूर्वक सांभाळा. कौटुंबिक स्नेह मेळाव्याच्या केंद्रस्थानी व्यग्र राहाल. विवाहाचा प्रस्ताव आपल्या प्रेम प्रकरणाला आयुष्यभराच्या बंधनात बदलले.

**सिंह** — तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. आर्थिक प्रश्नांमुळे रचनात्मक विचार करण्याची आपली ताकद नष्ट होईल. प्रभावी ठरणाऱ्या आणि महत्त्वाच्या पदांवरील लोकांशी संपर्क साधता यावा आणि संबंध वाढवावेत यासाठी तुम्हाला वेगवेगळया कार्यक्रमांना हजेरी लावणे ही चांगली संधी ठरेल.

**कन्या** — बसताना कोणतीही दुखापत होणे टाळण्यासाठी काळजी घ्या. खुर्चीत किंवा कोचावर कुठेही व्यवस्थित, नीटपणे बसले तर व्यक्तिमत्व खुलून दिसते. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे योग्य पद्धतीने बसल्यामुळे आरोग्य आणि आत्मविश्वास वाढतो. आर्थिक दृष्ट्या आज दिवस मिळता-जुळता राहील.

**तूळ** — उत्स्फूर्तपणे वागण्यावर नियंत्रण ठेवा आणि दुराग्रही स्वभावावर नियंत्रण ठेवा. खासकरून पार्टीमध्ये त्यामुळे एखाद्याचा मूड खराब होईल. आर्थिक दृष्ट्या आज दिवस मिळता-जुळता राहील. आज तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो परंतु, यासाठी तुम्हाला कठीण मेहनत करावी लागेल.

**वृश्चिक** — तुम्हाला बळीचा बकरा बनविण्याचा प्रयत्न होऊ शकतो, त्यामुळे अत्यंत दक्ष राहावे लागेल. ताण तणाव आणि दडपणात वाढ होण्याची शक्यता आहे. आज अनुभवी आणि नावीन्यपूर्ण कल्पना असलेल्या लोकांच्या सल्ल्यानुसार पैसे गुंतवा. आज यशाचे हेच समीकरण उपयोगी ठरेल.

**धनु** — तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. मोठया योजना आणि चांगल्या संकल्पना असलेली व्यक्ती तुमचे लक्ष वेधून घेईल - त्या व्यक्तिची विश्वासनीयता तपासून पाहा आणि नंतरच त्या योजनेत गुंतवणूक करा.

**मकर** — हवेत इमले बांधण्यात तुमचा वेळ वाया घालवू नका. त्यापेक्षा काहीतरी अर्थपूर्ण गोष्टी करण्यावर आपली ऊर्जा खर्च करा. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो. तुम्ही त्यांना धन देण्यापूर्वी त्याची विश्वसनीयता जाणून घ्या अथवा धन हानी होऊ शकते.

**कुंभ** — मानसिक, नैतिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण घेणेही संपूर्ण विकासासाठी आवश्यक ठरते. सशक्त मन हेच सशक्त शरीरामध्ये वास करते. धनाची देवाण-घेवाण आज दिवसभर असेल आणि दिवस मावळण्याची वेळी तुम्ही बचत करण्यात यशस्वी असाल.

**मीन** — इतरांना आपल्यासाठी काही करावयास भाग पाडू नका, जबरदस्ती करू नका. इतरांच्या आवडी-निवडी, गरजांचा विचार करा, त्याने तुम्हाला अमर्याद आनंद मिळेल. इच्छा आशीर्वाद म्हणून पूर्ण होतील आणि उत्तम नशिब फळफळेल - आणि पूर्वीच्या दिवसांमध्ये केलेली मेहनत फळाला येईल.

# महाराष्ट्र सदन येथे निवासी आयुक्त यांच्या हस्ते अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रध्वज वितरण

**नवी दिल्ली :** प्रधान सचिव तथा महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त रूपिंदर सिंग यांच्या हस्ते महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आज राष्ट्रध्वज वितरीत करून 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविण्यात आले.

स्वातंत्र्याच्या महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती मैदान, मुंबई पासून देशभरात राबविण्यात येणारा 'हर घर तिरंगा' (घरो घरी तिरंगा) अभियानास प्रारंभ केला. राज्य शासनाच्यावतीने 'घरोघरी तिरंगा अभियाना'ची सुरुवात झाली असून, या अभियानातंर्गत आज कोपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनात निवासी आयुक्तांच्या हस्ते राष्ट्रध्वज वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदनाच्या परिसरात असणाऱ्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या घरोघरी जावून यावेळी निवासी आयुक्तांनी राष्ट्रध्वज वितरित केले. हे ध्वज प्रत्येकांनी घरावर लावण्याचे आवाहन यावेळी केले. या आवाहनाला प्रतिसाद देत सदनातील घराघरांवर राष्ट्रध्वज डौलाने फडकले. यावेळी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'घरोघरी तिरंगा', 'वंदे मातरम', 'भारत माता की जय' असे नारे दिले व वातावरण देशभक्तीमय केले.

निवासी आयुक्त रूपिंदर सिंग यांनी सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार व श्रीमती स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांच्यासह उपस्थित महाराष्ट्र सदनातील अधिकारी -कर्मचाऱ्यांना राष्ट्रध्वज वितरित केले.

# लोकसभेच्या अपयशामुळेच लाडकी बहीण योजना, शिवस्वराज्य यात्रेत सुप्रिया सुळे यांची राज्य सरकारवर टीका

**तुळजापूर :** लोकसभा निवडणुकीत महायुतीला आलेल्या अपयशामुळेच राज्य सरकारने लाडकी बहीण योजना आणली आहे. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत ही फसवी योजना सत्ताधाऱ्यांना धडा शिकवेल, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने काढण्यात आलेली शिवस्वराज्य यात्रा दोन दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात आहे. मंगळवारी परंडा येथे झालेल्या सभेनंतर तुळजापूर शहरात बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत सुप्रिया सुळे बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी आमदार राहुल मोटे, ज्येष्ठ नेते जीवन गोरे, अशोक जगदाळे, माजी आमदार जयदेव गायकवाड, जिल्हाध्यक्ष संजय पाटील-दूधगावकर, भारत जाधव, सक्षणा सलगर, मनीषा पाटील, आदित्य गोरे, बसवराज नारळकर, विकास लवंडे, मेहबूब पटेल आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

बुधवारी तुळजापूर शहरात शिवस्वराज्य यात्रेचे आगमन झाल्यानंतर खासदार सुळे, कोल्हे व प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर आयोजित सभेत बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, व्यवहारात पैसा आणि नात्याला महत्त्वाचे स्थान असते. सरकारला पंधराशे रुपये देऊन नाते विकत घेता येते, असाच समज झाला आहे. लाडक्या बहिणीच्या फसव्या नात्याला महिलांनी बळी पडू नये. सत्ताधारी पक्षाच्या दोन आमदारांनी या योजनेबद्दल जी भाषा वापरली, त्यामुळे ही योजना दोन महिनेच सरकार राबविणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अनेकवेळा सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला. सरकारने दूध, कांदा, सोयाबीन, कापूस याला भाव न दिल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, येत्या विधानसभा निवडणुका महत्वाच्या आहेत. लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. विधानसभा निवडणुकीतही त्याचीच पुनरावृत्ती पहायला मिळणार आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडून भरमसाठ पैशाचा वापर केला गेला. तरी देखील तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून ५४ हजारांचे मताधिक्य महाविकास आघाडीला मिळाले. हे मताधिक्य विधानसभा निवडणुकीतही कायम ठेवण्याचे आवाहन जयंत पाटील यांनी केले.खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी, सरकारने कोव्हिड काळात काम केलेल्या ७४ हजार भगिनींचे अद्यापही मानधन दिलेले नाही.

# हर घर तिरंगा' अंतर्गत जिल्हा परिषद ठाणे येथे कार्यक्रम संपन्न



**ठाणे :** 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत जिल्हा परिषद ठाणे येथे दि. ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान अभियान साजरे करण्यात येत असून मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी तिरंगा सन्मानाबाबत शपथेचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता पार पडला. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वातंत्र्य दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामस्थांनी या आनंद उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात साजरे करण्यात येत असून या अभियानांतर्गत जिल्हा परिषद अंतर्गत आज अधिकारी व कर्मचारी यांनी शपथ घेतली. 'मी आपला तिरंगा ध्वज फडकवेन. स्वातंत्र्यसैनिक व वीर हुतात्मे यांच्या भावनेचा सन्मान करेन आणि भारताच्या विकास आणि प्रगतीसाठी स्वतःला समर्पित करेन' अशी शपथ घेण्यात आली. जिल्हा परिषद केंद्र शाळा वेहेळे येथील विद्यार्थी यांनी "देश माझा मी देशाचा, सदैव ठेऊ भान" समुहगायन केले. यावेळी उप मुख्य कार्यकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, महिला व बालविकास विभाग प्रमुख संजय बागुल, पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर, लघुपाठबंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी, जिल्हा परिषद केंद्र शाळा वेहेळे येथील शिक्षक व विद्यार्थींनी उपस्थित होते.

# रामलल्लाची मूर्ती साकारणाऱ्या अरुण योगीराज यांना अमेरिकेने व्हिसा नाकारला

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाची सुंदर मूर्ती घडविणार कर्नाटकच्या म्हैसूर येथील मूर्तीकार अरुण योगीराज यांना अमेरिकेने व्हिसा नाकारला आहे. व्हर्जिनिया येथे तीन दिवसांच्या परिषदेसाठी ते अमेरिकेत जाणार होते. अमेरिकेत बारावी जागतिक कन्नड परिषद ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान संपन्न होणार आहे. या परिषदेसाठी अरुण योगीराज उपस्थित राहणार होते. मात्र त्यांचा व्हिसा नाकारला गेल्यामुळे आता योगीराज यांच्या कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे.





अरुण योगीराज यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, व्हिसा मिळविण्यासाठी जे कागदपत्रे लागतात, ती सर्व आम्ही पुरविली होती. तरीही व्हिसा का नाकारण्यात आला, याची कोणतीही माहिती सध्या देण्यात आलेली नाही. अरुण योगीराज यांच्या पत्नी विजेता यांनी याआधी अमेरिकेचा दौरा केला आहे. तेव्हा कोणतीही अडचण आली नव्हती, आताच व्हिसा का नाकरला गेला, याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

योगीराज कुटुंबीयांनी सांगितले की, अरुण आणि त्याची पत्नी केवळ या परिषदेसाठी अमेरिकेला जाणार होते. परिषद संपन्न होताच ते भारतात परतणार होते. योगीराज यांनीही व्हिसा नाकारल्यानंतर आश्चर्य व्यक्त केले.

दरम्यान जागतिक कन्नड परिषदेने अरुण योगीराज यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केले होते. निमंत्रण पत्रिकेत परिषदेने म्हटले की, मूर्ती घडविण्याच्या कामात तुम्ही अनन्यसाधारण असे योगदान दिले आहे. तुमचा कलात्मक दृष्टीकोन या परिषदेला एका उंचीवर घेऊन जाईल. तुमचे कार्य सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णतेच्या भावनेला जिवंत स्वरुप देते, जे आमच्या परिषदच्या उद्देशाशी जवळीक साधणारे आहे.

**कोण आहेत अरुण योगीराज**

अरूण योगीराज हे कर्नाटकमधल्या मैसूरचे आहेत. त्यांचं घराणंच मूर्तीकारांचं आहे. कारण गेल्या पाच पिढ्यांपासून त्यांच्या घरात मूर्ती तयार करण्याचं काम होतं. अरुण योगीराज हे फक्त कर्नाटकातच नाहीत तर देशभरातल्या प्रसिद्ध मूर्तीकारांमधले एक प्रतिथयश मूर्तीकार म्हणून त्यांची गणना होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अरुण योगीराज यांच्या कामाचं कौतुक केलं आहे. अरुण यांना मूर्ती साकारण्याचा वारसा आपल्या घरातूनच मिळाला आहे.

अरुण योगीराज यांनी केदारनाथ या ठिकाणी आदी शंकराचार्यांचा १२ फूट उंचीचा पुतळाही साकारला आहे. मैसूर या ठिकाणी स्वामी रामकृष्ण परमहंस यांची मूर्तीही त्यांनी साकारली आहे. मैसूरच्या राजाचा १४ फुटांचा पुतळाही त्यांनी तयार केला आहे. तर मैसूर या ठिकाणीच त्यांच्या हातातून निर्मिलेली हनुमानाची २१ फुटांची मूर्तीही बसवण्यात आली आहे. तर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांचा १५ फूट उंचीचा पुतळाही त्यांनी तयार केला आहे.

# Delhi airport's expanded new Terminal 1 to be opened to passengers from August 17

**Delhi** - The newly expanded world-class Terminal 1 (T-1) of Delhi's Indira Gandhi International airport will be operational from August 17, announced Delhi International Airport Ltd (DIAL) on Wednesday. This expansion was part of the Phase 3A expansion project, which was inaugurated by Prime Minister Narendra Modi on March 10.The older T-1 building is still under repair and only the new building will be opened to the public on August 17, said airport officials.On June 28 a part of the metal canopy over Terminal 1 collapsed due to heavy rainfall, resulting in the death of one man and injury of eight others. After the incident, IndiGo and SpiceJet flight operations, which majorly used T-1, were shifted to Terminals 2 and 3.In preparation for the terminal's opening, DIAL has coordinated with airlines IndiGo and SpiceJet to shift their flight operations back to Terminal 1. SpiceJet will be the first to transition, moving 13 flights to the new terminal on August 17. IndiGo will follow suit on September 2, transferring 34 of its flights from Terminals 2 and 3 to Terminal 1.Regarding the terminal's launch, Videh Kumar Jaipuriar, CEO of DIAL, said, "The state-of-the-art Terminal 1 will significantly boost our capacity, easing pressure on Terminals 2 and 3. Passengers can expect a smoother travel experience with improved amenities and advanced technology."


ABHINAV SAHA

# Consumer panel junks woman's complaint against Uber for drivers refusing rides with pet dog



**Mumbai** - A consumer commission here has dismissed a woman's complaint against cab aggregator Uber for its drivers refusing her rides when she was accompanied by her pet dog.

There is no law or legal provision in India regarding the transportation of pets in public vehicles, said the District Consumer Disputes Redressal Commission, Central Mumbai, in an order passed on Tuesday.

In her complaint filed in June 2022, the woman, a Wadala resident, stated that despite the company's pet-friendly policies, she was denied a ride by Uber drivers on two occasions after she informed them that her pet dog would be traveling with her.

The woman demanded Rs 10 lakh in compensation for "deficiency in service, unfair trade practices, mental agony, and litigation expenses".

She also requested the commission to direct the company to take measures to allow commuters to travel with pets and stray animals in the cabs.

Uber India pointed out that the complainant did not make the drivers — against whom the woman had the grievance — parties to the case.

# लाडकी बहीण योजनेबद्दल पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला सुनावलं

**पुणे** - पुणे जमीन अधिग्रहण प्रकरणावरुन सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर पुन्हा एकदा ताशेरे ओढले आहेत. लवकरात लवकर भरपाईचा योग्य मसुदा घेऊन या. अन्यथा आम्ही सांगू त्याप्रमाणे ती भरपाई याचिकाकर्त्यांना द्यावी लागेल असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. तसंच लाडकी बहीण योजना आणि त्यासारख्या योजना बंद करण्याबाबत आम्ही निर्णय का घेऊ नये? असंही सर्वोच्च न्यायालयाने सुनावलं आहे. सर्वोच्च न्यायलाने महाराष्ट्र सरकारला भूमि अधिग्रहण प्रकरणाच्या एका खटल्यात लाडकी बहीण योजनेवरुन सुनावलं होतं. महाराष्ट्र सरकारने सुमार साठ वर्षांपूर्वी एका व्यक्तीच्या मालमत्तेवर अवैध कब्जा केला होता, असं याचिकाकर्त्यांचा दावा आहे. त्यांची वनजमीन अधिग्रहीत केली होती. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत इशारा देत सांगितलं की ज्या व्यक्तीने जमीन गमावली त्या व्यक्तीला जर योग्य मोबदला दिला नाही तर आम्ही लाडकी बहीण योजनेवर बंदी घालण्याचे आदेश देऊ. तसंच त्या जमिनीवर उभं असलेलं बेकायदा बांधकामही तोडण्याचे निर्देश देऊ, असं सुनावलं होतंच याशिवाय आज पुन्हा एकदा तसेच ताशेरे ओढण्यात आले आहेत.



## पुण्याचं जमीन अधिग्रहण प्रकरण नेमकं काय आहे?

याचिकाकर्ते टी. एन. गोदाबर्मन यांच्या पूर्वजांनी पुण्यात २४ एकर जमीन खरेदी केली होती. राज्य सरकारने ही जमीन ताब्यात घेतली पण याचिकाकर्त्यांना मोबदला दिला नव्हता. सरकारने ही जमीन डिफेन्सच्या शिक्षासंकुलाला देण्यास सांगितलं. ज्यानंतर याचिकाकर्त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यावेळी राज्य सरकारच्या वतीने हे सांगण्यात आलं की आम्ही त्या व्यक्तीला मोबदला म्हणून जमीन दिली आहे. प्रत्यक्षात संबंधित व्यक्तीला वनजमीन देण्यात आली. यानंतर याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितलं आहे.

# विधानसभा निवडणूक देशासाठी महत्वाची, राज्यातल्या सत्ताबदलाचे हादरे केंद्राला बसणार: रमेश चेन्नीथला


**अमरावती** - जननायक राहुल गांधी यांच्या भारत जोडो व भारत जोडो न्याय यात्रेमुळे लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले. पण विधानसभेची लढाई सोपी नाही. केंद्रात व राज्यात विरोधकांची सत्ता आहे. धनशक्ती व सत्तेचा गैरवापर करण्यात महायुती कुप्रसिद्ध आहे. त्यामुळे गाफील राहू नका. महाराष्ट्राची निवडणूक देशासाठी महत्वाची असून, राज्यातील सत्ताबदलाचे हादरे दिल्लीलाही बसणार आहेत, असे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.



विधानसभा निडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी अमरावती येथे अमरावती व यवतमाळ जिल्ह्याची बैठक संपन्न झाली, यावेळी व्यासपीठावर, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, उत्तर प्रदेशचे प्रभारी अविनाश पांडे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, CWC सदस्य माजी मंत्री यशोमती ठाकूर, आदिवासी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराव मोघे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, एनएसयुआय अध्यक्ष आमिर शेख, खा. बळवंतराव वानखेडे, खा. प्रतिभा धानोरकर, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, एस. सी. विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, अनिस अहमद, प्रा. वसंत पुरके, माजी आमदार विरेंद्र जगताप, अमरावती शहराध्यक्ष बबुल शेखावत, जिल्हा अध्यक्ष अनिरुद्ध ऊर्फ बबलु देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुती सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. शेतकऱ्यांच्या नावाने योजना काढून त्यातूनही पैसा खाल्ला आहे. महाराष्ट्राला बेरोजगारांचे राज्य बनवले आहे. भाजपा युती सरकारचे विकासाचे मॉडेल हे केवळ दिखावा आहे. विकासाच्या नावाखाली सर्रास लुट सुरु आहे. महाराष्ट्राला वाचविण्यासाठी आता भ्रष्ट सरकारला पायऊतार करावेच लागेल. विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, लोकसभेत काँग्रेस पक्षाची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी झाली आहे आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे यश दिमाखदार असले पाहिजे. महायुती सरकार बेकायदेशीर आहे. न्यायालतील निकाल वेळेवर लागला असता तर सरकारचाच निकाला लागला असता. महायुती सरकारच्या भ्रष्टाचारावर विधानसभेत काँग्रेसने आवाज उठवला पण सरकारने उत्तर दिले नाही. आता या सरकारच्या भ्रष्टाचाराची पोलखोल जनतेत जाऊन करू. यावेळी बोलताना अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक म्हणाले की, काँग्रेस पक्ष सर्वधर्मसमभाव माननारा आहे पण आरएसएसचा सर्वधर्म समभावावर विश्वास नाही, त्यांचे स्वयंसेवक संविधान मानत नाहीत पंतप्रधान हे ही स्वयंसेवक आहेत.

# Know more about Khopoli hospital where he will be treated



**Pune**- The Rajasthan High Court on Tuesday granted seven-day parole to self-styled Godman Asaram Bapu for Ayurvedic treatment. Bapu, who is serving a life sentence at a Jodhpur jail for raping a minor girl, will undergo treatment at Madhavbaug Multidisciplinary Cardiac Care Clinic and Hospital's oldest facility at Khopoli, a hill station between Mumbai and Pune. Yogesh Walawalkar, chief marketing officer at Madhavbaug Hospitals, said, "We have been informed that Asaram Bapu wants to avail treatment at our hospital. However, the exact date of his arrival has not been confirmed." Bapu was arrested in August 2013 for raping a minor girl at his ashram in Jodhpur. He was convicted and sentenced to life imprisonment in the case by a Pocso court in 2018. Recently, he was admitted to AIIMS Jodhpur after he complained of unease and chest pain, and appealed to the Rajasthan High Court for treatment at Madhavbaug Hospital.

# देशभक्तीपर गाण्यांच्या सूरावटींनी निनादले महापालिका मुख्यालय 'घरोघरी तिरंगा' अभियानात झाला विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम

● ठाणे, (प्रतिनिधी) :

भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७८ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने, आज (१४ ऑगस्ट) ठाणे महानगरपालिका मुख्यालयात देशभक्तीपर गीते, नृत्य आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी गायलेल्या गीतांच्या सुरावटींनी महापालिका मुख्यालय निनादून गेले. 'घरोघरी तिरंगा' या अभियानातंर्गत ०९ ते १५ ऑगस्ट या काळात विविध कार्यक्रम ठाण्यात साजरे करण्यात आले. त्याचा कळसाध्याय आज महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात साकार झाला.

ठाणे महापालिका शाळांतील विद्यार्थी, महापालिका कर्मचारी, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे कर्मचारी व मीनाताई ठाकरे परिचर्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी या देशभक्तीपर कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, उप माहिती व जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर तसेच कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांना उपायुक्त उमेश बिरारी यांनी 'तिरंगा प्रतिज्ञा' दिली. कार्यक्रमाची सुरूवात आरक्षक योगेश विसपुते यांनी खड्या आवाजात छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर करुन केली. त्यानंतर, ठामपा शाळा क्र. ४४च्या विद्यार्थ्यांनी हे राष्ट्र देवतांचे.. हे राष्ट्र प्रेषितांचे, तर शाळा क्र. ४१च्या विद्यार्थ्यांनी 'ओ देश मेरे', शाळा क्र. ६४च्या विद्यार्थ्यांनी 'तेरी मिट्टी मे..', तर शाळा क्र.९५ च्या विद्यार्थ्यांनी 'उंच उंच तिरंगा गगनात' ही देशभक्तीपर गीते सादर केली.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी 'सारे जहाँ से अच्छा.. आणि जयोस्तुते ही दमदार गीते सादर करुन



कार्यक्रमात रंगत आणली. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या प्राची धारप व सहकारी तसेच विद्यार्थीनींनी 'छोडो कल की बाते... आणि हम होंगे कामियाब' ही गाणी सादर केली. महापालिका कर्मचारी संगीता बोरसे व सहकाऱ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर केले. तर शाळा ठामपा शाळा क्र. २९च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्ये सादर केली. अतिशय कमी कालावधीत महापालिकेचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी कार्यक्रम सादर केल्याबद्दल उपस्थित सर्वांनी त्यांचे कौतुक केले. ०९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबवित असलेल्या 'घरोघरी तिरंगा' हे अभियान ठामपाच्या माध्यमातून आपण शहरात राबवित आहोत. या अभियानाला नागरिकांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी नमूद करीत या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. ठामपा शाळांमध्ये शिकत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सुप्त गुण आहेत. त्यांचे कलागुण आज देशभक्तीपर गीते तसेच नृत्याच्या माध्यमातून पाहता आले. अतिशय कमी वेळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून कार्यक्रमाची तयारी करुन घेतल्याबद्दल सर्व शिक्षकांचे आभार उपायुक्त उमेश बिरारी यांनी मानले. ०९ ऑगस्टपासून स्वातंत्र्य दिनाचा सप्ताह आपण साजरा करत आहोत. घरोघरी तिरंगा या अभियानाच्या माध्यमातून सर्वांनी घरोघरी तिरंगा फडकावयाचा असून या तिरंग्याचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगावे. १५ ऑगस्टनंतर जर कोणाला तिरंगा कुठेही पडलेला आढळल्यास तो सन्मानाने उचलला गेला पाहिजे. तिरंग्याचा अवमान होता कामा नये, तिरंग्याबद्दल प्रत्येकाला अभिमान असला पाहिजे, अशा पध्दतीची जनजागृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये करणे गरजेचे असल्याचेही उपायुक्त उमेश बिरारी यांनी नमूद केले. अत्यंत नीटनेटक्या पध्दतीने सादर केल्याबद्दल सर्व विद्यार्थी, कर्मचारी यांचे आभार उपायुक्त जी.जी. गोदेपुरे यांनी व्यक्त केले व सर्वांनी भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

### शाळांमध्ये तिरंगा यात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रम

ठाणे महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये ०९ ते १४ ऑगस्ट या काळात तिरंगा यात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहाने आयोजन करण्यात आले होते. त्यात तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच, तिरंगा गीतही सादर करण्यात आले.

## 'जयभीम'वाला उमेदवार देणार का? लक्षवेधी फलकांची चर्चा



● यवतमाळ, (प्रतिनिधी) :

समाजातील दलित, वंचित, मागास घटकांना 'जयभीम' या एका नाऱ्याने लढण्याचे बळ देवून जगण्याचा मार्ग दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्चवर्णीयांच्या विळख्यात जगणं हरवलेल्या समाजाला दिशा देवून त्यांच्यातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय मागासलेपण दूर केले आणि समाज मुख्य प्रवाहात आला. बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना ओठातून सहज 'जयभीम' असा उद्घोष निघतो. पण यवतमाळात आज अनेक ठिकाणी 'जयभीमवाला उमेदवार देणार का' हा प्रश्न लिहिलेले फलक सर्वच राजकीय पक्षांना सणसणीत चपराक हाणणारे ठरले आहे. शहरातील संविधान चौक, पूनम चौक आदी वर्दळीच्या ठिकाणी 'आपण आगामी विधानसभा निवडणुकीत 'जयभीम'वाला उमेदवार देणार का?' असा रोखठोक प्रश्न सर्वच पक्षांना विचारला आहे. या फलकावर, 'प्रति, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पाटी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) राष्ट्रवादी काँग्रेस पाटी (अजित पवार गट), शिवसेना (उबाठा), शिवसेना (शिंदे गट) आणि वंचित बहुजन आघाडी... आपण आगामी विधानसभा निवडणुकीत जयभीमवाला उमेदवार देणार का?' असा मजकूर असलेला प्रश्न 'आम्ही यवतमाळ विधानसभा जयभीमवाला मतदार' या नावाने विचारण्यात आला आहे. या फलकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ठळकपणे प्रसिद्ध करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक चौकात लागलेल्या या फलकांनी नागरिकांचे लक्ष वेधले आहे. हे फलक कोणी लावले, याबाबत अनभिज्ञता आहे. मात्र, आज शहरातील नागरिक या फलकाबाबत चर्चा करत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी होते.जयभीमवाला उमेदवार म्हणजे डॉ. बाबासाहेब यांना मानणारा कोणत्याही समाजाचा अनुयायी की केवळ बौद्ध समाजाचा उमेदवार, याबाबत या फलकावरील मजकुरात कोणतीही स्पष्टता नाही.

## आ. महेश शिंदे यांना राष्ट्रवादी महिलांकडून निषेधार्थ चोळी बांगडी भेट

● कोरेगाव, (प्रतिनिधी) :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व सातारा जिल्ह्याचे सुपुत्र नामदार एकनाथ शिंदे गटाचे कोरेगावचे शिवसेना आमदार महेश शिंदे यांनी कोरेगाव येथे वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमामध्ये आपण लाडकी बहिण योजनेबाबत वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा निषेध म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी आज चोळी -बांगडी भेट पाठवून निषेध व्यक्त केला आहे. सध्या लाडकी बहीण योजनेचा मोठ्या प्रमाणात गाजावाजा होत आहे. यानिमित्त विधानसभेच्या निवडणुकीत मतदार महिला वर्गाने महायुतीचे काम करावे व त्यांनाच मतदान करावे.

यासाठी दबाव तंत्र वापरले जात आहे. त्यामुळेच कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील एका गावातील लाभार्थीचे नाव कमी करु व त्यांना मराठा आरक्षण देऊ असे भाष्य केले होते. त्याचा पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उठवण्यात आलेला आहे. मराठा योद्धा श्री मनोज जारंगे पाटील यांनीही आमदार महेश शिंदे यांचा समाचार घेतलेला आहे.



टिकेची झोड उठवली असतानाच सातारा जिल्ह्यातील आ. महेश शिंदे यांच्या विरोधात महिलावर्ग संताप व्यक्त करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महिला पदाधिकाऱ्यांनी आज सातारा येथील पोस्ट कार्यालयात जाऊन आमदार महेश शिंदे यांच्या खटाव येथील निवासस्थानी चोळी बांगडी व माफीनामा लिहून द्या असे पत्र पाठविले आहे. त्यामध्ये शाब्दिक निषेध व्यक्त केलेला आहे. आमदार महेश शिंदे यांनी तमाम महिला वर्गाची जर जाहीर माफी मागितली नाही तर यापुढील आंदोलन आक्रमकरीत्या करून त्यांना त्यांची जागा दाखवण्यात येईल. असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला राज्य सदस्या सौ समिंदरा जाधव यांनी दिलेला आहे. आज वास्तविक पाहता केंद्र व राज्य सरकारची योजना ही कोणत्याही पक्ष अथवा लोकप्रतिनिधी यांची नसते तर ती जनतेच्या विकासाशी निगडीत असते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण आणता येत नाही हे संकेत आहेत. त्यामुळे आम्ही या सर्वांचा निषेध करीत आहोत. आपण आमच्या माता भगिणींची माफी मागुन या विषयावर पडदा टाकावा.

ही आपल्या राजकीय कारकीर्दीसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. आपण जाहीर माफी मागुन हा विषय संपवायला हवा अशी आशा आम्ही व्यक्त करतो. आपण जर असे केले नाही तर तमाम माता भगिणी लोकशाहीने दिलेल्या मतदानाच्या अधिकारातुन आपणाला आपली जागा दाखवतील. शेवटी निर्णय देणे आपल्या हातात आहे. तरी आपण माता भगिणींची माफी मागितली नाही तर सर्व माता भगिणी रस्त्यावर उतरुन आंदोलन करू. व माता भगिणींचा फॉर्म रिजेक्ट झाल्यास त्यास सर्वस्वी तुम्ही जबाबदार असाल. असेही स्पष्ट केले आहे. या पत्रावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी महिला सुषमा राजेघोरपडे, प्राची ताकतोड,शारदा भस्मे ,नूतन गायकवाड ,रेश्मा खरात पूजा सोनवणे ,कविता बनसोडे प्रजावती बनसोडे,आशा जाधव ,स्वाती निंबाळकर ,साक्षी शिवगण ,अर्चना पाटील ,नलिनी जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होत्या. आमदार महेश शिंदे यांनी शिवसेनेची मते मिळवून आमदार बनले असले तरी पक्षाशी गद्दारी केल्यामुळे त्यांना माजी आमदार होण्याची घाई झालेली आहे. अशी ही महिला वर्गामध्ये चर्चा सुरू झाली आहे. यावेळी महिला वर्गाने संतप्त घोषण दिल्या. मतदारांचे आहेत मिंधे.., आमदार महेश शिंदे...,, लाडक्या बहिणीचा कराल अपमान, आता धडा शिकवेल त्यांचे मतदान... अशाही घोषणाबाजी दिल्या असल्याची माहिती महिलांनी दिली.

## स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पिंपरीतील २१ पोलिसांना 'विशेष सेवा पदक' जाहीर



● पिंपरी, (प्रतिनिधी) :

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी राज्यातील ११४८ पोलिसांना 'विशेष सेवा पदक' जाहीर केले. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील २० अधिकारी आणि एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे. नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारक आळा घालण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना दरवर्षी महासंचालकांकडून 'विशेष सेवा पदक' दिले जाते. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला या पदकांची घोषणा केली जाते. पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील दोन पोलीस निरीक्षक, १८ पोलीस उपनिरीक्षक आणि एक पोलीस कर्मचारी अशा २१ जणांना हे पदक जाहीर झाले आहे. शिरगाव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तेजस्विनी कदम यांनी नक्षलग्रस्त भागात साडेतीन वर्षे सेवा केली आहे. त्यामुळे त्यांना 'विशेष सेवा पदक' जाहीर झाले आहे. सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी गोंदिया येथे सेवा केली असून त्यांना देखील हे पदक जाहीर झाले आहे. त्याचबरोबर पोलीस उपनिरीक्षक सागर देवकर, महेश सातपुते, मिलिंद कुंभार, गणेश आटवे, विठ्ठल सूर्यवंशी, सोहन धोत्रे, बालाजी मेटे, संतोष जायभाये, श्रीकिशन कांदे, दतात्रय सुकाळे, श्रीकांत गुरव, महादेव भालेराव, आबा कटपाळे, राहुल दुधमल, लक्ष्मण मोगले, अनिल टार्फे, चंद्रशेखर मोरखंडे, राजेंद्र पानसरे आणि पोलीस शिपाई योगेश्वर कोळेकर यांना 'विशेष सेवा पदक' जाहीर झाले आहे.

## 'लेझर शो'मुळे गोसेखुर्दचे सौंदर्य फुलले

● नागपूर, (प्रतिनिधी) :

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशातील ऐतिहासिक इमारती, शासकीय कार्यालयाच्या इमारतींवर विद्युत रोषनाई केली जाते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असलेल्या भारतात प्रेक्षणीय स्थळे आणि धरणांवरही रोषनाई करण्यात येत आहे. याच बरोबर आता महाराष्ट्रातील एकमेव राष्ट्रीय सिंचन प्रकल्प असलेल्या गोसेखुर्द धरणावर लेझर शो दाखवण्यात येत आहे. भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर हे धरण



उभारण्यात आले आहे. वैनगंगा ही मोठी नदी असून बावनथडी, बाघ, सूर आणि कन्हान या उपनद्या आहेत. या नद्यांचे पाणी वैनगंगेत येते. तसेच मध्यप्रदेशातील संजय सरोवर, गोंदिया जिल्ह्यातील सिरपूर, पुजारीटोला, कालीसराट, धापेवाडा आणि आंतरराज्यीय बावनथडी प्रकल्पांसह कन्हान नदीवरील पेंच, तोतलाडोह, पवनारखैरी आणि चवराई या प्रकल्पांचे पाणीही गोसेखुर्द प्रकल्पात जमा होते. भंडारा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सिंचन सुविधा यामुळे होत आहे. या धरणाला इंदिरासागर प्रकल्प किंवा गोसेखुर्द (गोसेखुर्द) प्रकल्प असे म्हटले जाते. गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्प आहे. धरणाचे भूमिपूजन २३ ऑक्टोबर १९८४ रोजी भारताचे तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी केले होते. गोसीखुर्द धरणाचे ३३ दरवाजे उघडले. पवनीपासून १२ किलोमीटर अंतरावर महत्त्वाकांक्षी गोसेखुर्द धरण आहे. या धरणात पाण्याची साठवणूक केल्यामुळे धरणाचे सौंदर्य अधिकच खुलले आहे. धरणाच्या घाटउमरीच्या बाजूने असलेले हिरव्या वनराईने नटलेले डोंगर धरणाचे निळेशार पाणी पाहूनच पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फेडले जातात. धरणाच्या ३३ वक्रदारांनी धरणाला भव्य बनवले आहे. हे धरण नेहमी चर्चेत राहत असल्यामुळे रोजच पर्यटकांची येथे गर्दी होते. या धरणाच्या एका टोकाहून दुसरीकडे ये-जा करण्याची व्यवस्था आहे. गोसेखुर्द प्रकल्पात जलपर्यटन विकास करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यात भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पात जलपर्यटन विकासाबाबत सामंजस्य करार झाला आहे.

## असावा सुंदर प्लॅस्टिकचा बंगला... पुण्यात चक्क ८५ हजार बॉटल्स वापरून बांधलं देखणं घर

● पुणे, (प्रतिनिधी) :

पर्यावरणासाठी प्लास्टिक आणि प्लास्टिकच्या बाटल्या किती घातक आहेत, हे सर्वांनाच माहीत आहे. पण तरीही त्याचा वापर काही कमी होत नाही. दिवसभरात पाण्याच्या, कोल्ड्रिंक्सच्या हजारो बॉटल्स कचऱ्यात जमा होतात. याच बॉटल्सचा अतिशय देखणा प्रयोग पुण्यातील आर्किटेक्ट राजेंद्र इनामदार यांनी केलाय. ज्या प्लास्टिकच्या बॉटल्स आपण फेकून



देतो, त्याच प्लास्टिकच्या बॉटल्सचा उपयोग करत त्यांनी दहा गुंठ्यांमध्ये अतिशय सुंदर असं घर बांधलं आहे. सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या घेरा गावात इनामदार यांनी प्लास्टिकच्या बाटल्यांपासून घर साकारलंय. विशेष म्हणजे घराच्या भिंती विटांऐवजी चक्क कचऱ्यात फेकून दिलेल्या पाण्याच्या बॉटल्सपासून उभारल्या आहेत. त्यासाठी ८५ हजार बॉटल्सचा वापर करण्यात आला. 'प्लॅस्टिक रिसायकल' ही संकल्पना डोक्यात ठेवून सिंहगडावरून तसेच इतरत्र कचराकुंडीत टाकून दिलेल्या बॉटल्स त्यांनी गोळा केल्या आणि स्वप्नात बघू तसं घर प्रत्यक्षात साकारलं. याबाबत बोलताना राजेंद्र इनामदार यांनी सांगितल, "प्लास्टिकच्या बाबतीत सरकारनं ठोस पावलं उचलावी, असा सतत विचार येत होता.

## लोकसभेच्या पाठोपाठ विधानसभेत सुद्धा भाजपाला 'फेक नॅरेटिव्ह'ची चिंता

● मुंबई, (प्रतिनिधी) :

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सध्या जोरात चर्चेत आहे. परंतु या योजनेवरून महायुतीतील नेते बेताल वक्तव्यं करू लागल्यानं त्याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. कारण मागच्या लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्हचा फटका महायुतीला मोठ्या प्रमाणात बसला, असं त्यांचंच मत आहे. आता भाजपाचे वरिष्ठ नेते सतर्क झाले असून त्यांनी बेताल वक्तव्य करणाऱ्या नेत्यांना लगाम लावण्यास सांगितलं आहे. मागच्या लोकसभा निवडणुकीत कर्नाटकमधील भाजपाचे नेते, खासदार, माजी केंद्रीय मंत्री अनंत कुमार हेगडे यांनी ४०० खासदार निवडून आले तर संविधान बदलू अशा पद्धतीचं वक्तव्य केलं होतं. हेगडे यांच्या याच वक्तव्याचा फटका मागच्या निवडणुकीत देशभरात भाजपाला बसला. भाजपानं कितीही आरडा ओरड करून फेक नॅरेटिव्हचा मुद्दा गाजवण्याचा प्रयत्न केला, तरी सुद्धा त्यात ते यशस्वी झाले नाहीत. हेगडे यांच्या वक्तव्याची किंमत भाजपाला निवडणुकीत मोजावी लागली. आता विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून तशाच पद्धतीची वक्तव्यं महायुतीचे नेते करत असल्यानं फेक नॅरेटिव्हपासून बचाव करण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना दमछाक करावी लागत आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना महायुतीचे आमदार रवी राणा यांनी, ज्या



लाडक्या बहिणी येत्या विधानसभा निवडणुकीत आशीर्वाद देणार नाहीत, त्यांचे पंधराशे रुपये परत घेईन. या पद्धतीचं वक्तव्य करून महायुतीला अडचणीत आणलं. तर दुसरीकडे शिंदे सेनेचे आमदार महेश शिंदे यांनीसुद्धा निवडणुकीत साथ न देणाऱ्यांचं नाव लाडकी बहीण योजनेतून कट करू, असा इशारा जाहीर कार्यक्रमातून दिला. अगोदरच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून सत्ताधाऱ्यांना टीकेचं धनी व्हावे लागत असताना, विरोधकांच्या हाती आयतं कोलीत मिळालं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उघडपणे रवी राणा आणि महेश शिंदे या दोन्ही आमदारांना त्यांच्या वक्तव्यावरून खडसावलं. 'कुणाचा बाप जरी आला तरी बहिणींची योजना बंद करू शकत नाही'. जोपर्यंत हे त्रिमूर्ती सरकार आहे, तोपर्यंत योजना सुरूच राहणार असं फडणवीस म्हणाले आहेत. तर निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही योजना आणलेली नसून काहीजण विनाकारण नको ती वक्तव्यं करतात आणि त्यातून नाहक महायुतीच्या सरकारची बदनामी होते. म्हणून असे प्रकार होऊ देऊ नका, असं अजित पवार यांनी खडसावलं आहे. ज्या पद्धतीनं 'लाडली बहना' या योजनेचा फायदा भाजपाला मध्य प्रदेशमध्ये झाला. त्याच पद्धतीनं महाराष्ट्रात होईल, अशी आशा महायुतीला आहे. या कारणानं महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी ही योजना आणली गेली असून त्याची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यासाठी महायुती सरकार कसोटीचे प्रयत्न करत आहे. अशामध्ये रवी राणा आणि महेश शिंदे या आमदारांनी केलेल्या वक्तव्यामुळे निवडणुकीनंतर योजना सुरू राहील की बंद होईल, याबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण होईल. ज्या पद्धतीनं संविधान बदलाच्या चर्चेनं लोकसभा निवडणुकीत वातावरण फिरले तशा पद्धतीचं वातावरण लाडकी बहीण योजनावरून राज्यात होणार तर नाही ना, अशी भीती आता भाजपाला वाटू लागली आहे.